सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ९

# पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३

(दिनांक २५ एप्रिल २००० पर्यंत सुधारलेला)

## Maharashtra Act No. IX of 1974

# The Pandharpur Temples Act, 1973

*(As Modified upto 25th April, 2000)*

(किंमत रु. ११)

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९

# पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३

---

अनुक्रमणिका

उद्देशिका


कलमे — पृष्ठे

## प्रकरण एक
## प्रारंभिक

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ .. .. .. .. | २ |
| २. | व्याख्या .. .. .. .. | २ |
| ३. | विवक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्यांचा अधिकार .. | ८ |

## प्रकरण दोन

### बडवे, सेवाधारी, उत्पात इत्यादींचे हक्क व विशेषाधिकार इत्यादी नाहीसे करणे आणि रक्कम प्रदान करणे

| | | |
|---|---|---|
| ४. | बडवे इत्यादींचे हक्क नाहीसे करणे आणि ते समिती इत्यादीकडे निहित होणे | ९ |
| ५. | हक्क आणि विशेषाधिकार इत्यादी नाहीसे केल्याचे परिणाम .. | १० |
| ६. | हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे केल्याबद्दल रक्कम प्रदान करणे .. | ११ |
| ७. | रक्कम, हक्क, हितसंबंध इत्यादींवर दावा सांगण्याची रीत .. | १२ |
| ८. | इतर कोणत्याही व्यक्तीचे हक्क नाहीसे केल्याबद्दल द्यावयाची रक्कम .. | १२ |
| ९. | जिल्हा न्यायालयाकडे निर्देश करणे .. .. .. | १२ |
| १०. | प्राधिकृत अधिकाऱ्याचे जिल्हा न्यायालयाकडे निवेदन .. .. | १३ |
| ११. | नोटीस बजावणे .. .. .. .. | १३ |
| १२. | कार्यवाहींच्या व्याप्तीवरील निर्बंध .. .. .. | १३ |
| १३. | खुल्या न्यायालयात कामकाज चालणे .. .. .. | १३ |
| १४. | रक्कम ठरविताना जिल्हा न्यायालयाने विचारात घ्यावयाची बाब .. | १४ |

## अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १५. | आदेशांचे स्वरूप .. .. .. .. | १४ |
| १६. | कार्यवाहीचा खर्च .. .. .. .. | १४ |
| १७. | अपील .. .. .. .. | १४ |
| १८. | रक्कम देणे किंवा ती न्यायालयात जमा करणे .. .. | १४ |
| १९. | इतर प्रकरणांमध्ये भरणा केलेल्या पैशांची गुंतवणूक .. .. | १५ |
| २०. | व्याज देणे .. .. .. .. | १५ |


## प्रकरण तीन

### समिती


| | | |
|---|---|---|
| २१. | समिती स्थापन करणे .. .. .. .. | १५ |
| २२. | सदस्यांची निरर्हता .. .. .. .. | १६ |
| २३. | शासनाने सदस्यांची नेमणूक करणे .. .. .. | १६ |
| २४. | राज्य शासनाने नेमलेल्या सदस्यांचा पदावधी .. .. | १६ |
| २५. | सदस्य व सभापती यांचा राजीनामा .. .. .. | १६ |
| २६. | गैरवर्तणूक इत्यादीबद्दल सदस्यांना काढून टाकणे .. .. | १७ |
| २७. | पदावधीच्या काळातील सदस्यांची निरर्हता .. .. .. | १७ |
| २८. | तात्पुरती रिकामी झालेली पदे कशी भरावीत .. .. | १७ |
| २९. | सदस्यांचे पारिश्रमिक .. .. .. .. | १८ |
| ३०. | समितीचे कार्यालय व तिच्या सभा .. .. .. | १८ |
| ३१. | दोष किंवा जागा रिकामी राहणे यामुळे कृती विधिअग्राह्य न ठरणे .. | १८ |
| ३२. | समितीचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. .. | १८ |


## प्रकरण चार

### कार्यकारी अधिकारी व आस्थापना


| | | |
|---|---|---|
| ३३. | कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक .. .. .. | २० |
| ३४. | कार्यकारी अधिकाऱ्याच्या अर्हता व सेवेच्या शर्ती .. .. | २० |

## अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ३५. | कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये .. .. .. | २० |
| ३६. | कार्यकारी अधिकाऱ्याचे असाधारण अधिकार .. .. | २१ |
| ३७. | आस्थापना अनुसूची .. .. .. .. | २१ |
| ३८. | कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन व त्यांच्या सेवेच्या शर्ती | २१ |
| ३९. | मंदिरांच्या आवारात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या प्रयोजनार्थ, कार्यकारी अधिकाऱ्याने जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणे व त्याची कर्तव्ये पार पाडणे | २२ |
| | **प्रकरण पाच**<br>**अर्थसंकल्प व लेखापरीक्षा** | |
| ४०. | अर्थसंकल्प .. .. .. .. | २२ |
| ४१. | सुधारित किंवा पूरक अर्थसंकल्प .. .. .. | २२ |
| ४२. | लेखापरीक्षा .. .. .. .. | २३ |
| | **प्रकरण सहा**<br>**सर्वसाधारण** | |
| ४३. | मंदिर निधी .. .. .. .. | २३ |
| ४४. | मंदिर निधीचा वापर .. .. .. .. | २३ |
| ४५. | निदेश देणे, अहवाल, दस्तऐवज इत्यादी मागवणे यासंबंधीचे राज्य शासनाचे अधिकार | २४ |
| ४६. | शासनाने पाहणी करणे .. .. .. .. | २५ |
| ४७. | अभिलेख, इत्यादी मागविण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. .. | २५ |
| ४८. | सरकारी अधिकाऱ्यांनी विवक्षित दस्तऐवजांच्या प्रती किंवा त्यातील उतारे पुरविणे | २५ |
| ४९. | प्रशासन अहवाल .. .. .. .. | २५ |
| ५०. | अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे .. .. .. | २५ |
| ५१. | दाव्यास किंवा कार्यवाहीस रोध .. .. .. | २५ |
| ५२. | अधिनियमाचा अधिभावी अंमल .. .. .. | २५ |
| ५३. | समितीचे विसर्जन व अधिक्रमण .. .. .. | २६ |

## अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ५४. | नियम करण्याचा अधिकार .. .. .. .. | २६ |
| ५५. | उपविधी करण्याचा समितीचा अधिकार .. .. .. | २६ |
| ५६. | सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम लागू असणे .. .. | २७ |
| ५७. | अडचणी दूर करणे .. .. .. .. | २७ |
| | अनुसूची 'क' [कलम २ (छ) पहा.] .. .. .. | २७ |
| | अनुसूची 'ख' [कलम २ (न) पहा.] .. .. .. | ३० |
| | अनुसूची 'ग' [कलम २ (यक) पहा.] .. .. .. | ३० |
| | अनुसूची 'घ' [कलम ६ (१) पहा.] .. .. .. | ३१ |

# सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ९[1]

# [पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३]

[राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ३ एप्रिल १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आल्या :–

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० † (१-७-१९७५).*

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

**पंढरपूर येथील विठ्ठल व रुक्मिणी मंदिरात काम करणारे उपाध्ये व पुजारीवर्ग यांचे सर्व आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे करणे; असे हक्क आणि विशेषाधिकार संपादन करून ते त्या प्रयोजनास्तव स्थापन केलेल्या समितीकडे निहित करणे; अशा संपादनाबद्दल रकमा प्रदान करणे, ही मंदिरे, त्यांचे दाननिधी यांचे अधिक चांगले प्रशासन आणि नियमन करणे आणि विश्वस्त व्यवस्थांचे एकत्रीकरण करणे, उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींची तरतूद करणे यासाठी अधिनियम.**

१९५० **ज्याअर्थी,** मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० खाली सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था म्हणून
चा नोंदण्यात आलेल्या पंढरपूरमधील विठ्ठल मंदिर, रुक्मिणी मंदिर, परिवार देवता आणि विठ्ठल रुक्मिणी देवस्थान
मुंबई समिती या सर्वांच्या गैरव्यवस्थेबाबत महाराष्ट्र शासनाकडे तक्रारी आल्या;
२९

**आणि ज्याअर्थी,** शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक २७५१८-पी, दिनांक २१ ऑक्टोबर १९६८ द्वारे, उक्त सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेतील अभिकथित गैरव्यवस्था व त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट
१९५२ केलेल्या इतर बाबी यांची चौकशी करून त्याबाबत राज्य शासनाला अहवाल सादर करण्यासाठी, महाराष्ट्र
चा शासनाने, श्री. बी. डी. नाडकर्णी, जिल्हा न्यायाधीश (सेवानिवृत्त) यांचा समावेश असलेल्या चौकशी आयोगाची,
६० चौकशी आयोग अधिनियम, १९५२ अन्वये नेमणूक केली;

**आणि ज्याअर्थी,** उक्त आयोगाने आपला अहवाल दिनांक २ फेब्रुवारी १९७० रोजी शासनाला सादर केला;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७३, भाग पाच, पृष्ठे २९-३० (इंग्रजी) पहा. संयुक्त समितीच्या अहवालासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७३, भाग पाच, पृष्ठे २४७-२८६ (इंग्रजी) पहा.

† सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक पाच हा, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

* हा अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शवितो.

**आणि ज्याअर्थी,** उक्तआयोगाच्या शिफारशी व सूचना, तसेच विशेषकरून, राज्य विधान मंडळात उपरोक्त अहवालावर व्यक्त झालेली मते विचारात घेतल्यानंतर पुढील गोष्टी त्वरित करण्यात याव्यात असे महाराष्ट्र शासनाचे मत झाले आहे;

(एक) बडवे, उत्पात, मंदिरांचा तसेच त्यांच्या मालमत्तेचा कारभार पाहणारी कोणतीही समिती अथवा कोणत्याही व्यक्ती यांचे सर्व आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार अथवा त्यांच्याशी संबंधित कोणतेही दाननिधी अथवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था नाहीशी करणे आणि त्या प्रयोजनार्थ आणि तसेच अशा मंदिराचे, मालमत्तेचे अथवा, दाननिधीचे अथवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांचे अधिक चांगल्या रीतीने व्यवस्थापन, प्रशासन व नियमन व्हावे या प्रयोजनार्थ, नेमण्यात यावयाच्या समितीकडे, अशा मालमत्तेचा कब्जा देण्यास त्यांना आवश्यक करणे;

(दोन) बडवे, उत्पात, सेवाधारी, कोळी व इतर व्यक्ती यांचे मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन अथवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक पूजा करण्याचे सर्व आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार नाहीसे करणे, आणि मंदिरातील मूर्तींना अथवा देवतांना अथवा मंदिरांच्या अथवा त्यांच्या कोणत्याही मालमत्तेच्या विकासाच्या प्रयोजनार्थ देण्यात आलेली उपायने, दक्षिणा, देणग्या अथवा भेटवस्तू यांपासून उपार्जित होणाऱ्या उत्पन्नाचा मंदिरे, त्यातील मूर्ती अथवा देवता अथवा त्यांची कोणतीही मालमत्ता यांच्या प्रयोजनार्थ उपयोग व्हावा यादृष्टीने विनियोग करण्यासंबंधीचे सर्व आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार नाहीसे करणे आणि असे हक्क व विशेषाधिकार संपादन करून ते उपरोक्त समितीकडे निहित करणे आणि असे हक्क अथवा विशेषाधिकार यांच्या संपादनासाठी रकमा प्रदान करणे यासाठी तरतूद करणे;

(तीन) ही मंदिरे, त्यांचे दाननिधी यांचे अधिक चांगले प्रशासन आणि नियमन यासाठी आणि विश्वस्तव्यवस्थांचे एकत्रीकरण करण्यासाठी तरतूद करणे; आणि

(चार) उपरोक्त प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबींसाठी तरतूद करणे.

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चोविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, पंढरपूर मंदिर अधिनियम, १९७३ असे म्हणावे.

(२) राज्य शासन, राजपत्रातील, अधिसूचनेद्वारे नेमील अशा दिनांकास तो अंमलात येईल [१][आणि या अधिनियमाच्या [२]निरनिराळ्या, तरतुदींसाठी निरनिराळ्या तारखा नेमता येतील].

व्याख्या

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,

[३][(क) ''नेमलेला दिवस'', याचा अर्थ,

(एक) कलम १ चे पोट-कलम (२), कलमे २१ ते ३१, ३३, ३४, ३८ आणि ३९ यांच्या तरतुदींच्या संबंधात ३ जुलै १९७५ (ज्या तारखेस कलम १ च्या पोट-कलम (२) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेखाली त्या तरतुदी अंमलात आणल्या गेल्या ती तारीख); आणि

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० च्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] कलमे १ (२), २१ ते ३१, ३३, ३४, ३८ आणि ३९, दिनांक ३ जुलै १९७५ पासून अंमलात आली. शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्र. १५१७६/पी, दिनांक ३ जुलै १९७५ पहा.

[३] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम २ द्वारे मूळ खंडा ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

(दोन) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींच्या संबंधात, कलम १ च्या पोट-कलम (२) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेखाली ती तरतूद ज्या दिवशी अंमलात येईल तो दिवस;] असा आहे;

(ख) ''प्राधिकृत अधिकारी'' याचा अर्थ, धर्मादाय उप आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा नसणारा अधिकारी, किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या दर्जाचा आहे असे ज्याच्याबाबतीत राज्य शासनाचे मत असेल असा अधिकारी असा आहे;

(ग) विठ्ठल मंदिराच्या संबंधात ''बडवे'' याचा अर्थ, अशा सर्व व्यक्ती, ज्या उच्च न्यायालयाने गंगाराम व इतर **विरूद्ध** बानाजी शंकर व इतर या प्रकरणात (१८९१ पी. जे. १८२) दिलेल्या निर्णयानुसार केवळ मूर्ती, मंदिर व त्यांच्या मालकीची मालमत्ता यांचे मुख्य पुजारी, व्यवस्थापक, रक्षक व अवेक्षक म्हणून घोषित करण्यात आल्या असतील व त्या नात्याने सुव्यवस्था ठेवण्यास आणि परंपरेने सेवाधारींची जी कर्तव्ये असतील ती कर्तव्ये पार पाडण्यास सेवाधारींना पाचारण करण्यास बांधलेल्या असतील परंतु ज्यांच्या बाबतीत उपरोक्त मंदिर, मूर्ती किंवा मालमत्ता यांचे ते मालक नसल्याचे घोषित करण्यात आले आहे आणि ज्यांचे विठ्ठल मूर्तीच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनासंबंधीचे आनुवंशिक हक्क हे सखाराम भिमाजी बेणारे व इतर विरूद्ध गंगाराम बाबजी बडवे व इतर, (१८९२ चे अपील क्रमांक १४१) विठ्ठल डिंगरे व इतर (मूळ वादी) (सन १८९० चे अपील क्रमांक १३०) व गोवर्धन विठ्ठल डिंगरे (मूळ वादी) **विरूद्ध** गंगाराम बाबाजी बडवे व इतर (मूळ प्रतिवादी) (सन १८९१ चे अपील क्रमांक ५) (१८९४ पी. जे. ६) या प्रकरणामध्ये उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या व गंगाराम बाबाजी बडवे व इतर (मूळ प्रतिवादी) **विरूद्ध** सखाराम वामन (महा अधिवक्त्यांच्या संमतीने) व इतर (मूळ वादी) या १८९२ चे अपील क्रमांक १६८ (१८९६ पी. जे. ६४४) मधील उच्च न्यायालयाचे अगोदरचे निर्णय धरून नंतरच्या निर्णयाद्वारे, स्पष्ट करण्यात आलेल्या वा सुधारण्यात आलेल्या योजनेद्वारे, निश्चित करण्यात आले आहेत, आणि ज्या, त्यानुसार, विठ्ठल मंदिरात, कोणत्याही न्यायालयाचा कोणताही आदेश अथवा हुकूमनामा याखाली अथवा अन्यथा, दावा सांगितलेले कोणतेही इतर हक्क आणि विशेषाधिकार धरून, आपले आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार यांचा वापर करीत आहेत अशा सर्व व्यक्ती असा आहे; आणि त्यात, दिवसकरी बडव्यांचा समावेश होईल;

(घ) ''बेणारी'' याचा अर्थ, जी व्यक्ती विठ्ठल मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन अथवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक पूजेच्या ठराविक वेळी, वेदांतील अथवा अन्य मंत्र अथवा स्तोत्र यांचे पठण करणे या आनुवंशिक हक्काचा व विशेषाधिकाराचा वापर करते आणि यजमानाची पूजेच्या उपकरणांची भेट, भक्ताकडून त्याच्या हातात देण्यात येईल तेव्हाच ती स्वीकारणे हा हक्क धरून, असे आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार यांचा वापर केल्याने मिळणारे उत्पन्न स्वतःचे म्हणून घेणे व त्याचा स्वीकार करणे, गणपती, वरूण व भूमी यांच्या पूजेच्या वेळी पौरोहित्य करणे आणि पैशाच्या स्वरूपातील उपायाने स्वीकारणे आणि विठ्ठल मंदिरात होणाऱ्या मुंज व विवाह समारंभाच्या वेळी जोशी आणि उपाध्याय म्हणून पौरोहित्य करणे आणि गंगाराम बाबाजी व इतर **विरूद्ध** नारायण आण्णाजी व इतर (१८९१ पी. जे. १४८,) यामध्ये उच्च न्यायालयाच्या निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेले हक्क व विशेषाधिकार म्हणून रूढीनुसार दक्षिणा घेणे या आनुवंशिक हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर करते ती व्यक्ती असा आहे. आणि अशा हक्कात, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशान्वये किंवा हुकूमनाम्यान्वये किंवा अन्यथा, ज्यावर दावा सांगण्यात येत असेल किंवा ज्यांचा वापर करण्यात येत असेल अशा इतर हक्कांचा व विशेषाधिकारांचा समावेश होईल;

(ङ) ''उप-विधी'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये समितीकडून करण्यात आलेले उप-विधी असा आहे;

(च) ''समिती'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २१, अन्वये स्थापन करण्यात आलेली समिती असा आहे. आणि त्यात त्या कलमान्वये नेमलेल्या तात्पुरत्या समितीचा समावेश होईल;

(छ) ''दैनंदिन किंवा नित्य सेवा'' याचा अर्थ विठ्ठल मंदिरात, आणि विठ्ठल मंदिरात ज्या रीतीने सेवा करण्यात येतात त्याच रीतीने परंतु देवीच्या बाबतीत योग्य असतील त्या बदलासह रुक्मिणी देवीच्या मंदिरात करण्यात येतात अशा, या सोबतच्या अनुसूची 'क' मध्ये वर्णन केलेल्या सेवा;

(ज) ''डांगे'' याचा अर्थ जी व्यक्ती, काकड आरतीपासून शेजारतीपर्यंत विठ्ठल मंदिरात हजर राहणे, सर्व दैनंदिन पूजा आणि दैनंदिन अथवा विशेष सेवा (जत्रा किंवा तत्सम इतर दिवस नसेल अशा) यावेळी हजर राहणे, अशा सर्व पूजांच्या वेळी सुव्यवस्था ठेवणे, हातात चांदीचा, किंवा सोन्याचा अथवा इतर धातूचा अथवा लाकडाचा दंड घेऊन, कमानी दरवाजा जवळ (मग बाहेर असो अथवा आत) उभे राहून या सर्व प्रसंगी चोपदरांचे कर्तव्य पार पाडणे, भक्त अथवा यात्रेकरू यांच्याकडून दक्षिणा मागणे, त्यांच्याकडून त्याला देण्यात येणारी दक्षिणा स्वीकारणे, सेवाधारीकडे देण्यात आलेल्या उपायनांचा एक-तृतीयांश हिस्सा स्वीकारणे; आवश्यक असेल तेव्हा, बडव्याच्या आदेशाविना, स्वतंत्रपणे इतर सेवाधारींना बोलावणे, सकाळच्या आरतीच्या व संध्याकाळच्या धूपारतीच्या वेळेस धूपारती व दंड हाती घेणे व परिचारक---सेवाधारीपैकी एक--यासह, रुक्मिणी व इतर गौण देवदेवतांपुढे आरती ओवाळणे, गरूड मंदिराजवळ आल्यावर उपस्थित भक्तांना व यात्रेकरूंना विभूती देणे, त्यांच्याकडे दक्षिणा मागून ती स्वीकारणे आणि नगराच्या उत्तर भागात अंगारा वाटणे, आणि रामचंद्र बाबाजी **विरुद्ध** गंगाराम बाबजी, कृष्णा बाबाजी, विश्वनाथ गोपाळ व इतर (अपील क्र. ३७) आणि गंगाराम बाबाजी, कृष्णा बाबाजी, विश्वनाथ गोपाळ व इतर **विरुद्ध** रामचंद्र बाबाजी या, दिनांक २८ सप्टेंबर १८९४ रोजी निकाल देण्यात आलेल्या, १८९३ चे अपील क्रमांक ४४ मध्ये, प्रथमवर्ग दुय्यम सह-न्यायाधीश, ए. पी. यांच्या निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेले हक्क व विशेषाधिकार व शेषाधिकार म्हणून त्याबद्दल दक्षिणा स्वीकारणे या आनुवंशिक हक्कांचा अथवा विशेषाधिकारांचा वापर करते अशी व्यक्ती असा आहे; अशा आनुवंशिक हक्कांत, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये अथवा हुकूमनाम्यान्वये अथवा अन्यथा ज्यावर दावा सांगण्यात आला असेल अशा कोणत्याही हक्कांचा व विशेषाधिकारांचा समावेश होईल.

(झ) ''दिवसकरी बडवा किंवा उत्पात'' याचा अर्थ विठ्ठलापुढे किंवा यथास्थिती, रुक्मिणीपुढे भक्त अथवा यात्रेकरू यांच्याकडून ठेवण्यात येणाऱ्या दुसऱ्या दिवशीची उपायने घेण्याचा बडव्यांचा किंवा उत्पातांचा अधिकार जो खरेदी करतो आणि त्या प्रयोजनास्तव, त्या दिवसाच्या उपायनांवर त्याचा हक्क असल्याने,विठ्ठलाच्या अथवा रुक्मिणीच्या मूर्तीजवळ उपस्थित राहतो, असा बडवा अथवा उत्पात असा आहे;

(ञ) ''डिंगरे'' म्हणजे, जी व्यक्ती देवाचा साज झाल्यानंतर देवास आरसा दाखवणे, आणि सिंहासनापासून शेजघरापर्यंतची जमीन झाडून, त्यावर सडासंमार्जन करणे, त्यावर पांढऱ्या व रंगीत रांगोळीने आकृत्या काढणे (रांगोळीच्या ठशांसह) आणि त्यानंतर, रात्रीच्या विश्रांतीकरिता देव ठराविक वेळी शेजघरात (किंवा शय्यागृहात) जात असल्याचे समजण्यात येईल तेव्हा, त्या मार्गावर पाऊलघड्या घालणे, विठ्ठल मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन पूजा विधी पार पाडणे, या आनुवंशिक हक्काचा व विशेषाधिकाराचा वापर करते आणि (भक्त व यात्रेकरू यांच्याकडून पाऊल घडीवर ठेवण्यात येतील अशी कोणतीही उपायने व भक्तांकडून त्यांच्या हाती ठेवण्यात येतील अशा कोणत्याही वस्तू स्वीकारणे या गोष्टी धरून) गंगाराम बाबाजी बडवे व इतर **विरुद्ध** गोवर्धन विठ्ठल डिंगरे व इतर आणि गोवर्धन विठ्ठल डिंगरे व इतर **विरुद्ध** गंगाराम बाबाजी बडवे व इतर (१८९४ पी. जे. ६) या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेले हक्क व विशेषाधिकार यांचा वापर करून उत्पन्न घेणे व ते स्वीकारणे या आनुवंशिक हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर करते अशी व्यक्ती असा आहे; आणि अशा हक्कांमध्ये, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये अथवा हुकूमनाम्यान्वये अथवा अन्यथा ज्यावर दावा सांगण्यात आला असेल अशा इतर कोणत्याही हक्कांचा अथवा विशेषाधिकारांचा समावेश होईल;

(ट) ''जिल्हा न्यायालय'' याचा अर्थ, सोलापूर येथील जिल्हा न्यायालय;

(ट) ''दिवटे'' म्हणजे, जी व्यक्ती काकडआरतीपासून शेजारतीपर्यंत हातात दिवटी धरून विठ्ठल मंदिरात हजर राहणे. सर्व दैनंदिन पूजांना आणि दैनंदिन व विशेष उपचारांना (देवाच्या गाभाऱ्यात होत नसतील अशा) हजर राहणे, ज्यामध्ये पंचामृताने अभिषेक करण्यात येतो अशा सर्व प्रकारच्या यजमान पूजांना हजर राहणे, गरुडाच्या देवळाजवळ 'यस्य कृत्य' हा मंत्र म्हणण्यात येतो अशा यजमान पूजेत हातात दंड घेऊन कमानी दाराजवळ उभे राहणे, मंत्र म्हटल्यानंतर त्यापूर्वी नव्हे, इतर सेवाधारी बरोबर दक्षिणा मागणे गरुडाच्या देवळासमोर असा मंत्र म्हणण्यात येत नसेल त्याबाबतीत, देवतेच्या गाभाऱ्यातून यजमान बाहेर येईल व पूजा समाप्त झाल्याचे घोषित करण्यात येईल त्यावेळी, यजमान गरुडाच्या देवळासमोर आल्यावर, यजमानांकडे दक्षिणा मागणे, भक्तांपैकी अथवा यात्रेकरूंपैकी कोणीही सोने, चांदी अथवा इतर धातूचा अथवा लाकडाचा दंड प्रत्यक्ष त्याच्या हाती देईल तर तो घेणे, भक्तांना अथवा यात्रेकरूंना सर्वसाधारणपणे कोणताही अडथळा अथवा उपद्रव होऊ न देता, त्यांच्याकडे दक्षिणा मागणे व ती घेणे, सेवाधारींच्या उत्पन्नातील बारावा हिस्सा स्वीकारणे, यजमान पूजा संपल्यानंतर, हरदासांबरोबर यजमानांना त्यांच्या निवासापर्यंत साथ देणे आणि त्यांच्याकडून दक्षिणा अथवा बक्षीस स्वीकारणे, आणि परिचारकांबरोबर, गौण देवदेवतांची काकडआरती व धूपारती करणे, अंगारा वाटणे आणि असे केल्याबद्दल दक्षिणा स्वीकारणे, आणि गोपाळ रामचंद्र दिवटे **विरुद्ध** गंगाराम बाबाजी व इतर या १८९३ च्या अपील क्रमांक ३९ यात आणि गंगाराम बाबाजी आणि इतर **विरुद्ध** गोपाळ रामचंद्र दिवटे या, दिनांक २८ सप्टेंबर १८९४ रोजी निकाल देण्यात आलेले १८९३ चे अपील क्रमांक ४५ मध्ये, सोलापूर येथील सह न्यायाधीशांचे न्यायालय, ए. पी. यांनी दिलेल्या निर्णयाद्वारे, मान्यता देण्यात आलेला कोणताही आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार म्हणून मूर्तीच्या पालखीमधून काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांच्या वेळी, हातात दंड घेऊन उपस्थित राहणे या आनुवंशिक विशेषाधिकाराचा वापर करते, अशी व्यक्ती असा आहे; आणि अशा आनुवंशिक हक्कात, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये अथवा हुकूमनाम्यान्वये अथवा अन्यथा, ज्यावर दावा सांगण्यात आला असेल अशा कोणत्याही हक्कांचा व विशेषाधिकारांचा समावेश होईल;

(ड) ''दाननिधी'' याचा अर्थ, मंदिर, किंवा त्यामधील कोणत्याही देवदेवता किंवा मूर्ती यांच्या मालकीच्या किंवा त्यांच्या परिरक्षणार्थ, सहाय्यार्थ किंवा लाभार्थ कोणत्याही नावाने, (देवदेवतांना भेटवस्तू वाहणे धरून) कोणतीही सेवा करण्यासाठी किंवा त्यासंबंधात धर्मादाय म्हणून, किंवा मंदिरास भेट देणारे भक्त व यात्रेकरू यांच्या लाभासाठी, सोयीसाठी किंवा आरामासाठी दिलेली (जडजवाहीर व दागदागिने धरून) सर्व स्थावर व जंगम मालमत्ता असा होतो; आणि त्यामध्ये, :—

(एक) मंदिरे व मंदिराचे आवार आणि त्यामधील सर्व देवदेवता किंवा मूर्ती आणि त्यांच्याशी संबंधित परिवार देवता,

(दोन) देवदेवतांच्या नावे असलेल्या सर्व जमिनी, इनामे, नगदी भत्ते व इतर मालमत्ता, जंगम किंवा स्थावर, मग ती कोठेही असो किंवा त्यावर देवदेवतांच्या किंवा मूर्तींच्या नावे निर्माण केलेले बोजे किंवा भार,

(तीन) मंदिर किंवा त्यामधील कोणतीही देवदेवता किंवा मूर्ती यांना दिलेली किंवा रोख रकमेच्या वा वस्तूंच्या स्वरूपात मिळालेली सर्व उपायने—भेटवस्तू किंवा देणग्या (भेट म्हणून दिलेल्या वस्तू धरून),

(चार) कोणत्याही, पवित्र धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी, मंदिरास किंवा त्यामधील कोणत्याही देवदेवतेस किंवा मूर्तीस किंवा समितीच्या नियंत्रणाधीन मंदिरातील कोणत्याही ठिकाणास, समर्पित केलेले, कोणत्याही साधनापासून उपार्जित व कोणत्याही नावाने असलेले, सर्व उत्पन्न, आणि

(पाच) मंदिर निधीतून खरेदी केलेली कोणतीही मालमत्ता,

यांचा समावेश होईल.

**स्पष्टीकरण.**—मंदिरातील देवदेवतांस किंवा मूर्तीस अर्पण करण्याची सेवा धरून कोणतीही सेवा करण्यासाठी, एखाद्या बडव्यास, सेवाधारीस किंवा उत्पातास किंवा इतर कोणत्याही व्यक्तीस, किंवा मंदिरात किंवा मंदिरासंबंधी धर्मादाय म्हणून देण्यात आलेली कोणतीही भेटवस्तू, इनाम किंवा जहागीर ही त्याविरुद्ध सिद्ध करण्यात आले नसेल तर, उक्त बडव्यास, सेवाधारीस किंवा उत्पातास किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस दिलेली व्यक्तिगत भेट म्हणून मानण्यात येणार नाही तर तो दाननिधी म्हणून मानण्यात येईल;

(ढ) ''कार्यकारी अधिकारी'' याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३३ अन्वये, नेमलेला मंदिराचा कार्यकारी अधिकारी असा आहे;

(ण) ''हरदास'' याचा अर्थ, जी व्यक्ती, विठ्ठल मंदिरात सतत उपस्थित राहणे व उक्त मंदिरातील नित्य म्हणजेच दैनंदिन किंवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक पूजा करण्यात येईल तेव्हा ठराविक वेळी 'आरती' (मूर्तीस ओवाळतांना मंत्रोच्चार करणे) घेणे, विवक्षित पवित्र दिवशी कीर्तने करणे आणि आषाढ व कार्तिक वद्य १ या दिवशी 'काला' सोहळा करणे, यासारख्या आनुवंशिक हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर करते आणि गंगाराम बाबाजी आणि इतर **विरुद्ध** सखाराम कुसाजी आणि इतर (१८९१ पी. जे. १३६) या प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार मान्यता दिलेल्या, आनुवंशिक हक्कांचा आणि विशेषाधिकारांचा (यात, सेवाधारींना दिलेल्या, उपायनांचा एक-षष्ठांश हिस्सा घेण्याचा आणि भक्तांनी त्याच्या हातात दिलेली वाद्ये घेण्याचा आणि पूजा समाप्त झाल्यावर, भिक्षावळ मागण्याचा अधिकार धरून) वापर केल्याने मिळणारे उत्पन्न घेते अशी व्यक्ती असा आहे; व अशा हक्कात व विशेषाधिकारात, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये किंवा हुकुमनाम्यान्वये किंवा अन्यथा, दावा सांगितलेल्या किंवा वापर केलेल्या कोणत्याही इतर हक्कांचा व विशेषाधिकारांचा समावेश होईल;

(त) ''उत्पन्न'' याचा अर्थ, कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने, कोणत्याही वर्षात, अशा वर्षात आपल्या आनुवंशिक हक्कांचा आणि विशेषाधिकारांचा वापर करून, नेमलेल्या दिवसापूर्वी घेतलेल्या किंवा तिला मिळालेल्या रकमेतून अशा हक्कांचा आणि विशेषाधिकारांचा वापर करताना झालेला खर्च वजा करून राहिलेली निव्वळ रक्कम असा आहे;

(थ) ''कोळी'' याचा अर्थ, मंदिराच्या उत्तर भागातील रामेश्वर आणि विश्वेश्वर, पश्चिम भागातील कोटेश्वर आणि 'विठ्ठल' मूर्तीच्या मस्तकावरील लिंग, या चार लिंगांची पूजा करण्याचा आणि त्यापासूनचे उत्पन्न मिळण्याचा आनुवंशिक हक्क आहे, असा जिचा दावा असेल अशा कोळी समाजातील, व्यक्ती असा आहे;

(द) ''क्षेत्रोपाध्ये'' याचा अर्थ, ज्यांना यजमान म्हणून संबोधण्यात येते असे भक्त किंवा यात्रेकरू यांना मान्य होईल असे पारिश्रमिक दिल्यावर, विठ्ठल किंवा रक्मिणी यांचे दर्शन घेण्याची ज्यांची इच्छा असेल अशा यजमानांची सेवा करणारी व्यक्ती असा आहे;

(ध) ''सदस्य'' याचा अर्थ, समितीचा सदस्य असा आहे;

(न) ''प्रासंगिक किंवा नैमित्तिक सेवा'' याचा अर्थ, सोबतच्या अनुसूची ''ख'' मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या, विठ्ठल आणि रुक्मिणी यांच्या मंदिरामध्ये प्रसंगपरत्वे करण्यात येणाऱ्या सेवा असा आहे. आणि त्यामध्ये समितीस धर्मादाय आयुक्तांच्या मान्यतेने त्याबाबतीत देता येतील अशा आदेशानुसार, कोणत्याही मंदिरामध्ये, वेळोवेळी करणे आवश्यक असतील अशा सर्व सेवांचा अंतर्भाव होतो;

(प) ''पुजारी'' याचा अर्थ, मूर्तीला स्नान घालणे आणि मूर्तीला साज चढविणे व तो उतरवणे, दागिने, फुले, हार आणि गंध लावणे व ते काढणे आणि आरती ओवाळणे किंवा विठ्ठल मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन किंवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक पूजा करण्यात येतील अशा संबंधित वेळी, मूर्तीला नैवद्य दाखविणे यासारखे प्रत्यक्ष पूजेचे काम करण्याच्या (आणि असे करण्यास बडवे त्यांना प्रतिबंध करू शकत नाहीत) आनुवंशिक हक्कांचा जी व्यक्ती वापर करते आणि गंगाराम बाबाजी बडवे व इतर **विरुद्ध** बानाजी शंकर व इतर (अपील क्रमांक

९०/१८८६) (१८९१ पी. जे. १८२) या प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेल्या अशा आनुवंशिक हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर केल्याने मिळणारे उत्पन्न (ओवाळणी किंवा ओवाळून टाकलेली उपायने---मग ती ठेव म्हणून दिलेली किंवा पुजाऱ्यास (दक्षिणा दिल्यानंतर दिलेली असो---) घेते अशी व्यक्ती असा आहे) व अशा हक्कात व विशेषाधिकारात कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये किंवा हुकूमनाम्यान्वये किंवा अन्यथा, दावा सांगितलेल्या किंवा वापर केलेल्या, इतर कोणत्याही हक्कांचा व विशेषाधिकारांचा समावेश होईल;

(फ) ''परिचारक'' याचा अर्थ, जी व्यक्ती प्रातःकाळी काकड आरतीच्या वेळी उपस्थित राहणे, बडव्यांच्या हातून काकडा घेऊन तो पुजाऱ्यास देणे, दुसऱ्या काकड आरतीच्या वेळी डाव्या हातात घंटा असलेल्या पुजाऱ्यापासून एकारती घेणे आणि नंतर हरदास व डांगे यांच्यासह, सायंकाळच्या धूपारतीच्या वेळी, लहान देवदेवतांना धूप व आरती ओवाळत प्रदक्षिणा घालणे, धुपाने भरलेले धूपपात्र व निरांजन आणणे, (व त्यानंतर ते सकाळप्रमाणेच लहान देवतांपुढे ओवाळणे) एकारती व अंगारा वस्त्रात गुंडाळून नगराच्या पूर्वेला जाणे, यात्रेकरूंच्या कपाळावर अंगारा लावणे व त्यांना निरांजन दाखवून त्यांच्याकडून बक्षीस घेणे, पंचामृती पूजेच्या किंवा यजमान पंचामृती पूजेच्यावेळी (परंतु दैनंदिन किंवा यजमानाच्या इतर पूजेच्यावेळी नव्हे) मूर्तींना स्नान घालण्यासाठी पाणी आणणे, यजमानपूजेसाठी, धूप व वाती यांची तरतूद करणे व विठ्ठल मंदिरातील नित्य म्हणजेच दैनंदिन किंवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक पूजा करण्यात येतात तेव्हा ठराविक वेळी पुजाऱ्यास आरती देऊन त्यास सहाय्य करणे अशा आनुवंशिक हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर करते आणि १८९० चे अपील क्रमांक १, गोपाळ त्र्यंबक परिचारक आणि इतर **विरुद्ध** गंगाराम बाबाजी बडवे आणि इतर, आणि १८९० चे अपील क्रमांक ५ मध्ये गंगाराम बाबाजी बडवे **विरुद्ध** गोपाळ त्र्यंबक परिचारक आणि इतर, १८९१ पी. जे. १३८ प्रकरणामधील उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मान्यता दिलेल्या अशा हक्कांचा व विशेषाधिकारांचा वापर केल्याने मिळणारे उत्पन्न, भक्तांनी त्यांना किंवा मूर्तींच्या वापरासाठी दिलेली सर्व धातूची भांडी, आरती पात्रे व घंटा या वस्तू धरून---मात्र त्या भक्तांकडून त्यांच्या हाती दिलेल्या असल्या पाहिजेत--घेते अशी व्यक्ती असा होतो, व त्यामध्ये कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही आदेशान्वये किंवा हुकूमनाम्यान्वये किंवा अन्यथा, दावा सांगितलेल्या किंवा वापर केलेल्या, कोणत्याही हक्कांचा आणि विशेषाधिकारांचा समावेश होईल;

(ब) ''परिवार देवता'' याचा अर्थ, विठ्ठलाचा किंवा यथास्थिति, रुक्मिणीदेवीचा लवाजमा असणाऱ्या किंवा ज्यांचा उत्सव करण्यात येतो अशा (यात खांबावर कोरलेल्या, भिंतीवर रंगविलेल्या देवदेवतांचा, तसेच त्यांच्या छायाचित्रांचा किंवा कोणत्याही चित्राचा समावेश होईल) (मंदिराच्या आवारात असलेल्या किंवा आवाराबाहेर असलेल्या) आणि अभिलेखात ज्यांची स्वतंत्र यादी आहे अशा सर्व देवता व देव असा आहे. (विठोबाच्या परिवार देवता) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाखाली, स्वतंत्र विश्वस्तव्यवस्था म्हणून नोंदण्यात येतात व रुक्मिणीच्या परिवार देवता (सत्यभामा आणि राई किंवा राधिका या देवता धरून) रुक्मिणी विश्वस्तव्यवस्थेत समाविष्ट करण्यात येतात ही विश्वस्तव्यवस्थाही त्या अधिनियमाखाली नोंदलेली आहे;

(भ) ''हितसंबंधित व्यक्ती'' याचा अर्थ, कलम ४ अन्वये आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार नाहीसा केल्याबद्दल या अधिनियमान्वये रक्कम मिळण्याचा हक्क असल्याचा जी दावा सांगते अशी व्यक्ती असा आहे;

१९५० (म) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले असा आहे;
चा
मुंबई- (य) ''सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम'' याचा अर्थ, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,
२९ १९५० असा आहे;

(यक) ''नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था'' याचा अर्थ, यासोबतच्या अनुसूची 'ग' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या विश्वस्तव्यवस्था असा आहे; आणि त्यात, या अधिनियमान्वये ज्या एकत्रित करण्यात येतील किंवा ज्यात भर घालण्यात येईल अशा विश्वस्तव्यवस्थांचाही समावेश होईल;

(यख) विठ्ठल मंदिरात केल्या जाणाऱ्या सेवेच्या किंवा पूजोपचारांच्या संबंधात ''सेवाधारी'' याचा अर्थ, ''पुजारी'', ''बेणारी'', ''परिचारक'', ''डिंगरे'', ''डांगे'', ''दिवटे'' आणि ''हरदास'' म्हणून ओळखल्या जातील अशा व्यक्ती असा आहे;

(यग) ''मंदिरे'' याचा अर्थ, पंढरपूर येथील विठ्ठल मंदिर (गरूड मंदिरासह) आणि रुक्मिणी देवीचे मंदिर असा आहे आणि त्यात परिवार देवतांचा, तसेच, नेमलेल्या दिवसानंतर वेळोवेळी त्यात जी भर घालण्यात येईल तिचा, किंवा त्यातील कोणत्याही फेरफारांचा समावेश होईल;

(यघ) ''मंदिर निधी'' याचा अर्थ, कलम ४३ अन्वये स्थापन करण्यात आलेला पंढरपूर मंदिर निधी असा आहे;

(यङ) ''उत्पात'' याचा अर्थ, रुक्मिणी देवी आणि परिवार देवता यांच्या मंदिराचा संपूर्ण प्रभार असल्याने जी व्यक्ती त्या मंदिरात, नित्य किंवा नैमित्तिक पूजा करण्याच्या आणि अशा आनुवंशिक हक्काचा किंवा विशेषाधिकाराचा वापर केल्याने मिळणारे उत्पन्न स्वतःचे म्हणून घेण्याच्या किंवा स्वीकार करण्याच्या, आनुवंशिक हक्कांचा किंवा विशेषाधिकारांचा वापर करते, अशी व्यक्ती असा आहे आणि त्यांत दिवसकरी उत्पाताचा समावेश होतो;

(यच) ''वर्ष'' याचा अर्थ, वित्तीय वर्ष असा आहे;

(यछ) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात जो अर्थ देण्यात आला आहे तोच अर्थ असेल.

विवक्षित प्रश्नांचा निर्णय करण्याचा प्राधिकृत अधिकाऱ्यांचा अधिकार

**३.** (१) (क) एखादी व्यक्ती---

(एक) बडवा,

(दोन) सेवाधारी,

(तीन) क्षेत्रोपाध्याय,

(चार) उत्पात,

(पाच) कोळी, किंवा

(सहा) हितसंबंध असलेली व्यक्ती

आहे किंवा कसे, अथवा

(ख) एखाद्या व्यक्तीला एखाद्या मंदिरात, किंवा मंदिरासंबंधात कोणत्याही आनुवंशिक हक्कांचा किंवा विशेषाधिकाराचा वापर करण्याचा हक्क आहे किंवा कसे, अथवा

(ग) एखाद्या व्यक्तीने आनुवंशिक हक्कांचा किंवा विशेषाधिकाराचा नेमलेल्या दिवसापूर्वी वापर केला आहे किंवा कसे, अथवा

(घ) एखादी व्यक्ती हितसंबंधित व्यक्तीची सहहिस्सेदार आहे किंवा कसे, अथवा

(ङ) उपरोक्त बाबीशी आनुषंगिक व त्यांच्या संबंधात प्रश्न उद्‌भवेल तेव्हा;

प्राधिकृत अधिकारी, त्या पक्षास त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि चौकशी केल्यानंतर, त्या प्रश्नाचा निर्णय करील.

१९६३ चा ३६ (२) प्राधिकृत अधिकाऱ्याच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, धर्मादाय आयुक्तांकडे अपील करता येईल. असे अपील दाखल करण्यास, मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५, १२ आणि १४ च्या तरतुदी लागू होतील.

(३) प्राधिकृत अधिकाऱ्यांचा निर्णय, पोट-कलम (२) खालील अपीलास अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल आणि कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही खटल्यात किंवा कार्यवाहीत त्यावर आक्षेप घेता येणार नाही.

## प्रकरण दोन

### बडवे, सेवाधारी, उत्पात इत्यादींचे हक्क व विशेषाधिकार इत्यादी नाहीसे करणे आणि रक्कम प्रदान करणे

बडवे इत्यादींचे हक्क नाहीसे करणे आणि ते समिती इत्यादीकडे निहित होणे

**४.** (१) कोणताही कायदा (कोणत्याही मंदिरासंबंधात त्या त्यावेळी अमलात असलेला कोणताही नियम, विनियम आणि उप-विधी धरून) रूढी किंवा परिपाठ, त्या त्यावेळच्या कोणत्याही शासक प्राधिकरणाचा कोणताही आदेश, कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही मंदिरासंबंधात केलेली तडजोड, अनुदान, सनद किंवा आदेश किंवा कोणताही हुकूमनामा, आदेश किंवा योजना यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नेमलेल्या दिवसापासून,——

(क) बडवे, उत्पात किंवा दाननिधी आणि नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांचा कारभार पाहणाऱ्या कोणत्याही समितीचे किंवा कोणत्याही व्यक्तीचे (मूर्ती, मंदिर व त्यांची मालमत्ता यांचे मुख्य पुजारी, व्यवस्थापक, रक्षक असण्याचा बडव्यांचा आनुवंशिक हक्क धरून), आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार; आणि

(ख) संबंधित परिवार देवतांसह मंदिरातील कोणत्याही देवदेवतांना, दिलेल्या उपायनांपासून मिळणारे उत्पन्न, यजमानांसाठी किंवा यजमानांच्या (म्हणजे भक्त किंवा यात्रेकरू) वतीने केलेल्या पूजेदाखल मिळणारे उत्पन्न, यजमानांना गंध लावण्याच्या किंवा त्यांना प्रसाद देण्याच्या हक्कामुळे मिळणारे उत्पन्न, कोणत्याही समितीस किंवा सेवाधारीस, यजमानांकडून मिळालेल्या रकमेतील कोणत्याही हिश्शामुळे मिळणारे उत्पन्न, पूजा, उपचार आणि तत्सम विधीपासून मिळणारे उत्पन्न किंवा मागितलेली दक्षिणा किंवा मंदिर किंवा त्याचा वापर यापासून किंवा त्यासंबंधात मिळणारे उत्पन्न, घेण्याचे, मागण्याचे आणि त्याचा विनियोग करण्याचे बडव्यांचे, उत्पातांचे, सेवाधारींचे, क्षेत्रोपाध्यायाचे, कोळ्यांचे आणि इतर सर्वांचे सर्व आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार; आणि

(ग) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी बडवे, उत्पात, सेवाधारी, क्षेत्रोपाध्याय, कोळी आणि इतर व्यक्ती कोणत्याही मंदिरात यजमानांच्या किंवा यात्रेकरूंच्यावतीने, देवदेवतांच्या ज्या नित्य म्हणजेच दैनंदिन किंवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक सेवा करीत होत्या त्या सेवा करण्याचे त्यांचे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार (यात यापुढे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार म्हणून संयुक्तपणें ज्यांचा निर्देश केला आहे).

याद्वारे नाहीसे करण्यात येत आहेत आणि त्यानंतर, उपरोक्त आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, संपादन करण्यात आल्याचे व समितीकडे ते निहित झाल्याचे मानण्यात येईल.

(२) विठ्ठलाच्या मूर्तीच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी नियम ५ अन्वये स्थापन करण्यात आलेली, आणि सखाराम भिमाजी बेणारे आणि इतर **विरुद्ध** गंगाराम बाबाजी बडवे आणि इतर, अपील क्रमांक १४१ आणि गंगाराम बाबाजी बडवे आणि इतर (मूळ प्रतिवादी) **विरुद्ध** सखाराम वामन (महा अधिवक्त्याच्या संमतीने) आणि इतर (मूळ वादी) अपील क्रमांक १६८ (१८९६, पी. जे. ६४४) यामध्ये उच्च न्यायालयाने मान्यता

दिलेली समिती किंवा देवस्थान समिती, समस्त बडवे मंडळ, समस्त बडवे समाज, उत्पात समिती, असल्यास ती, किंवा नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी दाननिधी किंवा नोंदलेली विश्वस्तव्यवस्था यांच्या संबंधात कार्य करणारी, कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे, कोणतेही इतर मंडळ यांचे काम करणे बंद होईल; आणि दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या संबंधातील त्यांचे सर्व अधिकार, कर्तव्ये, हक्क व कोणतेही विशेषाधिकार असल्यास ते समितीकडे निहित होतील.

हक्क आणि विशेषाधिकार इत्यादी नाहीसे केल्याचे परिणाम

५. (१) कलम ४ द्वारे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे केल्यानंतर आणि कलम ४, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या समित्या आणि मंडळे यांचे, नेमलेल्या दिवसापासून काम करण्याचे बंद झाल्यानंतर, पुढील परिणाम घडून येतील, म्हणजेच :—

(क) दाननिधी आणि नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था आणि त्यांचे अधीक्षण, निदेशन वा, नियंत्रण (त्यांचे प्रशासन, व्यवस्थापन आणि नियमन धरून) समितीकडे हस्तांतरीत होऊन तिच्याकडे ते निहित होईल, आणि समिती, अशा दाननिधीची आणि विश्वस्तव्यवस्थांची विश्वस्त असेल, आणि तदनुसार, कलम ४, पोट-कलम (२), मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही समिती किंवा मंडळ धरून, जी व्यक्ती, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी दाननिधी आणि नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या संबंधात कार्य करीत असेल किंवा त्यांचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण यांची व्यवस्था पहात असेल अशी प्रत्येक व्यक्ती तसे करण्याचे बंद करील आणि असा दाननिधी किंवा विश्वस्तव्यवस्था यांची कोणतीही मालमत्ता कब्जात असलेली प्रत्येक व्यक्ती, समितीच्या वतीने अशी सर्व मालमत्ता, कार्यकारी अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करील, आणि विशेषत: ज्यावरील अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण समितीकडे निहित असेल असे जडजवाहिर आणि अलंकार व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता कब्जात असलेली प्रत्येक व्यक्ती, त्या सर्व वस्तू, संपूर्ण वस्तूसूचीसह, नेमलेल्या दिवसापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, पंढरपूर येथील उप-कोषागाराच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील, आणि असा अधिकारी, वस्तुसूचीअनुसार उक्त जडजवाहिर आणि अलंकार यांची पडताळणी करील आणि कार्यकारी अधिकारी त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेची व्यवस्था करीपर्यंत असा अधिकारी त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसाठी आवश्यक ते सर्व उपाय योजील.

(ख) बडवे, सेवाधारी, उत्पात, कोळी आणि इतर यांचे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार यांचा वापर किंवा त्यांचे पालन करण्याचे बंद होईल आणि त्या दानदिधी किंवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या संबंधातील उपरोक्त हक्क व विशेषाधिकार यांचा वापर किंवा वापर करण्याचा प्रयत्न करणार नाही आणि अशा कोणत्याही बाबतीत, ते मंदिराच्या आवारात दक्षिणा म्हणून किंवा असे कोणतेही आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार यांचा वापर करण्यासाठी किंवा त्यांचे पालन करण्यासाठी कोणत्याही स्वरूपात, कोणतेही पारिश्रमिक, रोख रकमेत किंवा वस्तूच्यारूपाने मागणार नाही, त्याची अभियाचना करणार नाही किंवा मागणी करणार नाही किंवा घेणार नाही किंवा स्वीकारणार नाही.

(ग) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, कोणत्याही देवतेच्या संबंधात जी सेवा किंवा पूजोपचार बजावण्यात येत होता त्याच्या स्वरूपात, प्रतिष्ठेत, तिच्या शोभेत, थाटमाटात किंवा तिच्या पद्धतीत कोणत्याही प्रकारे खंड न पाडता किंवा व्यत्यय न आणता मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन पूजोपचार चालू राहतील हे समिती सुनिश्चित करील तसेच, समिती शक्यतोवर भक्तांना देवतांचे दर्शन उपलब्ध होईल हे सुनिश्चित करण्यासाठी विशेष काळजी घेईल. आणि त्या प्रयोजनार्थ समिती, मंदिराच्या यथोचित व्यवस्थापनाच्या दृष्टीने ती ठरवील अशा व्यक्तींची, अशा पारिश्रमिकावर आणि अशा अटींना व शर्तींना अधीन राहून नेमणूक करील.

राज्य शासन नेमलेल्या दिवसापासून नव्वद दिवसांपेक्षा अधिक नसणाऱ्या कालावधीसाठी, अशा सेवेप्रीत्यर्थ येणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक अशी रक्कम समितीच्या स्वाधीन करील आणि समितीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन, राज्य शासन वेळोवेळी ठरवील, अशा वाजवी कालावधीत, मंदिर निधीमधून, अशा रीतीने समितीच्या स्वाधीन करण्यात आलेल्या रकमेची राज्य शासनास प्रतिपूर्ती करील.

(घ) कोणतेही आनुवंशिक हक्क व विशेषाधिकार यासंबंधी किंवा कलम ४, पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या समित्या आणि मंडळे यासंबंधी कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे प्रलंबित असलेले सर्व दावे आणि कायदेविषयक कामकाज हे समाप्त होईल आणि [१][निमलेल्या दिवसानंतर] कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण असे कोणतेही दावे किंवा कायदेविषयक कामकाज दाखल करून घेणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये समितीकडे निहित असलेल्या दाननिधीच्या आणि नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा कब्जा मिळविताना पंढरपूर येथील उप-कोषागाराच्या प्रभारी अधिकाऱ्यास किंवा कार्यकारी अधिकाऱ्यास, कोणत्याही व्यक्तीकडून प्रतिकार झाल्यास---

(क) त्यास, अशा प्रतिकाराबद्दल किंवा अडथळ्याबद्दल तक्रार करणारा अर्ज, अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे करता येईल; आणि स्वतःच्या लाभाकरिता किंवा दाननिधी अथवा विश्वस्तव्यवस्था याव्यतिरिक्त स्वतंत्रपणे असलेल्या इतर अधिकाराच्या आधारे उक्त मालमत्ता आपल्या कब्जात असल्याचा सद्‌भावनापूर्वक दावा सांगत असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून असा प्रतिकार किंवा अडथळा करण्यात आलेला आहे याबद्दल त्याची खात्री झाली असेल तर त्या व्यतिरिक्त असा दंडाधिकारी, उप-कोषागाराचा प्रभारी अधिकारी किंवा यथास्थिती, कार्यकारी अधिकारी यांच्या कब्जात देण्याबद्दल आदेश देईल. असा आदेश, मालमत्तेच्या कब्जासंबंधीचा अधिकार प्रस्थापित करण्यासाठी जो दावा करता येईल त्या दाव्याच्या निकालास अधीन राहून अंतिम असेल; किंवा

१९०८ (ख) त्यास, जिल्हा न्यायाधीशांकडे अर्ज करता येईल, व जिल्हा न्यायाधीश दिवाणी प्रक्रिया संहिता,
चा ५. १९०८ अन्वये कब्जा मिळण्यासंबंधीचा अर्ज असल्याप्रमाणे, तो विचारात घेईल. आणि त्याअन्वये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार तो, निकालात काढील.

(३) पोट-कलम (२) अन्वये सद्‌भावनेने केलेल्या किंवा केल्याचे दिसून येणाऱ्या कोणत्याही गोष्टीबद्दल, उप-कोषागार अधिकारी किंवा कार्यकारी अधिकारी किंवा त्यांच्या आदेशानुसार काम करणारी किंवा त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा, किंवा खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करणार नाही :

परंतु, या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, त्याअन्वये करण्यात आलेल्या आदेशामुळे बाधा पोहोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त मालमत्तेवरील आपला हक्क प्रस्थापित करण्यासंबंधी दावा दाखल करण्यास, प्रतिबंध होणार नाही.

(४) पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणत्याही आनुवंशिक हक्कांचा आणि विशेषाधिकारांचा वापर केला किंवा वापर करण्याचा प्रयत्न केला किंवा वापर करावयास लावला किंवा कोणत्याही व्यक्तीस कोणतीही मालमत्ता स्वाधीन करण्यात कसूर केली तर पोट-कलम (२) च्या तरतुदींस बाध न येता तिला अपराधसिद्धीनंतर, दोन हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

**६.** (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून अनुसूची घ च्या स्तंभ १ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तींना, त्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमा देण्यात येतील.

हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे केल्या-बद्दल रक्कम प्रदान करणे.

(२) कलम ४, पोट-कलम (१) खंड (ब) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले कोणतेही उत्पन्न आपले म्हणून घेण्याचा कोणताही हक्क वगळता, दाननिधी आणि नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या कारभाराचे व्यवस्थापन करण्याचा त्यांचा आनुवंशिक हक्क या अधिनियमान्वये नाहीसा करण्यात आला आहे याच केवळ कारणावरून कोणतीही व्यक्ती, या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे कोणत्याही रकमेवर हक्क सांगणार नाही.

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ३ अन्वये ''या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यावर'' दाखल करण्यात आला.

रक्कम, हक्क, हितसंबंध, इ. वर दावा सांगण्याची रीत

**७.** (१) हितसंबंध असलेल्या प्रत्येक व्यक्तीला नेमलेल्या दिवसापासून नव्वद दिवसांच्या आत, प्राधिकृत अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करता येईल. अर्जामध्ये ती आपल्या हक्कांचे आणि विशेषाधिकारांचे स्वरूप, आपल्या हक्क मागणीची कारणे, व रकमेतील आपल्या हिश्शाचे प्रमाण दाखविणारा कोणताही दस्तऐवज असल्यास तो, आणि सह-हिस्सेदार असतील त्या व्यक्तींची नावे, या गोष्टी नमूद करील.

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज मिळाल्यानंतर, प्राधिकृत अधिकारी चौकशी करील आणि कलम ४ अन्वये जे हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे करण्यात आले असतील अशा कोणत्याही हक्कांबाबतचा आणि विशेषाधिकारांबाबतचा आपला हक्क अर्जदाराने प्रस्थापित केल्याबद्दल कलम ३ खालील कोणत्याही निर्णयास अनुसरून किंवा अन्यथा त्याची खात्री झाल्यास तो आदेश काढील आणि त्यामध्ये तो अर्जदाराला देय असेल ती रक्कम विनिर्दिष्ट करील. रकमेवर दावा सांगणारे सह-हिस्सेदार असतील त्याबाबतीत, प्राधिकृत अधिकारी सह-हिस्सेदारांमध्ये रकमेची विभागणी करील. उक्त रकमेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विभाजनासंबंधी किंवा ज्या व्यक्तींना ती रक्कम किंवा तिचा कोणताही भाग देय असेल त्या व्यक्तींच्या संबंधात वाद निर्माण झाल्यास प्राधिकृत अधिकाऱ्यास तो वाद निर्णयासाठी जिल्हा न्यायालयाकडे पाठविता येईल.

(३) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या तरतुदी त्या अधिनियमाखालील चौकशींना जशा लागू होतात त्याचप्रमाणे त्या या कलमाखालील चौकशींच्या संबंधात लागू होतील.

इतर कोणत्याही व्यक्तीचे हक्क नाहीसे केल्याबद्दल द्यावयाची रक्कम

**८.** (१) कोणत्याही व्यक्तीचे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे करण्याची किंवा ते संपादन करण्याची तरतूद ज्या तरतुदींद्वारे करण्यात आली आहे त्या तरतुदींमुळे कोणत्याही व्यक्तींस बाधा पोहोचली असेल तर किंवा असे हक्क आणि विशेषाधिकार नाहीसे करण्याबद्दल आणि ते संपादन करण्याबद्दल रक्कम देण्याची तरतूद पूर्वगामी तरतुदींमध्ये करण्यात आली नसेल तर, त्या व्यक्तीस अशा रकमेसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे अर्ज करता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज, प्राधिकृत अधिकाऱ्याकडे विहित कालावधीत आणि विहित नमुन्यात करण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाखालील चौकशी करण्यासाठी घालून दिलेल्या रीतीने चौकशी केल्यानंतर, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने आणि पद्धतीने रक्कम निर्धारित करणारा आदेश काढील.

(३) रक्कम निर्धारित करताना, प्राधिकृत अधिकारी कोणत्याही मंदिराच्या प्रशासनासाठी कोणत्याही न्यायालयाने केलेल्या योजनेतील तरतूद आणि दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नामध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार यांच्या संबंधात, नेमलेल्या दिवसापूर्वी उच्च न्यायालयाने आणि इतर न्यायालयाने दिलेले निर्णय यांचे मार्गदर्शन घेतील. परंतु, कोणत्याही बाबतीत, निर्धारित करण्यात आलेली रक्कम, सन १९५८ या कॅलेंडर वर्षापासून सुरू होणाऱ्या आणि दिनांक ३१ डिसेंबर १९६९ रोजी संपणाऱ्या १२ वर्षांच्या कालावधीत प्राधिकृत अधिकाऱ्याच्या मते बाधा पोहोचलेल्या व्यक्तीस जे उत्पन्न मिळत होते किंवा ती जे गोळा करीत होती अशा, वार्षिक उत्पन्नाच्या सरासरीची अडीच पट, अधिक, संपादनाचे सक्तीचे स्वरूप लक्षात घेऊन, सरासरी वार्षिक उत्पन्नाच्या पंधरा टक्क्याइतकी रक्कम, याहून अधिक असणार नाही.

जिल्हा न्यायालयाकडे निर्देश करणे

**९.** (१) कलम ७ किंवा कलम ८ अन्वये करण्यात आलेल्या आदेशाद्वारे जिला बाधा पोहोचली असेल अशा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस, प्राधिकृत अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून ती बाब जिल्हा न्यायालयाकडे विचारार्थ पाठविण्यास सांगता येईल. मग अशी हरकतही रकमेसंबंधी असो, किंवा हितसंबंधित व्यक्तींमध्ये तिची वाटणी करण्यासंबंधी असो.

(२) ज्या कारणावरून आदेशास हरकत घेण्यात आली असेल ती कारणे अर्जात नमूद करावीत. आणि असा प्रत्येक अर्ज, अशा आदेशाच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत करण्यात येईल.

(३) कलम ७ किंवा ८ अन्वये किंवा या कलमाखाली अर्जावर प्राधिकृत अधिकाऱ्याने केलेला कोणताही आदेश, प्राधिकृत अधिकारी हा जणू दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, कलम ११५ च्या अर्थान्तर्गत उच्च न्यायालयाचे दुय्यम न्यायालय असल्याप्रमाणे, उच्च न्यायालयाच्या पुनरीक्षणास अधीन असेल.

१९०८ चा ५

प्राधिकृत अधिकाऱ्याचे जिल्हा न्यायालयाकडे निवेदन

**१०.** (१) निर्देश करताना प्राधिकृत अधिकारी जिल्हा न्यायालयाच्या माहितीसाठी आपल्या सहीनिशी पुढील गोष्टी नमूद करील.––

(क) हितसंबंधित व्यक्तीने दावा सांगितलेल्या आनुवंशिक हक्काचे किंवा विशेषाधिकाराचे स्वरूप;

(ख) अशा हक्कात किंवा विशेषाधिकारात हितसंबंध असलेल्या व्यक्तींची नावे, आणि कलम ६ किंवा कलम ८ अन्वये देण्यात आलेल्या रकमेतील अशा प्रत्येक व्यक्तीचा हिस्सा;

(ग) अशा हक्कातून किंवा विशेषाधिकारातून प्राप्त होणारे एकूण उत्पन्न असल्यास ते उत्पन्न कसे काढले याबाबतची त्याची कोणतीही कारणे;

(घ) अर्जदाराने कागदोपत्री पुरावा प्रस्तुत केलेला असल्यास तो पुरावा;

(ङ) रकमेबाबत हरकत घेण्यात आली असेल तर त्याची कारणे.

(२) उक्त निवेदनास, अनुक्रमे, बजावण्यात आलेल्या नोटीसांचे आणि हितसंबंधित पक्षकाराकडून लेखी स्वरूपात करण्यात आलेल्या किंवा देण्यात आलेल्या निवेदनाचे तपशील देणारी अनुसूची जोडण्यात येईल.

नोटीस बजावणे

**११.** जिल्हा न्यायालय त्यानंतर पुढील व्यक्तींवर बजावावयाची नोटीस ज्या रीतीने ती बजावावयाची असेल त्याप्रमाणे ती बजाविण्याची व्यवस्था करील, व तीत, ज्या दिवशी न्यायालय हरकतीचा निर्णय करणार असेल तो दिवस विनिर्दिष्ट करून त्या दिवशी त्या व्यक्तींनी न्यायालयापुढे हजर राहण्याबाबत निदेश देईल :––

(क) अर्जदार;

(ख) प्राधिकृत अधिकाऱ्याच्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली रक्कम स्वीकारण्यास ज्यांनी निषेध न करता संमती दिली असेल अशा (कोणत्याही असल्यास) व्यक्तीखेरीज, हरकतीमध्ये हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती; आणि,

(ग) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमेच्या संदर्भात हरकत असेल तर, प्राधिकृत अधिकारी.

कार्यवाहींच्या व्याप्तीवरील निर्बंध

**१२.** अशा प्रत्येक कार्यवाहीतील चौकशीची व्याप्ती ही त्या हरकतीमुळे बाधा पोहोचलेल्या व्यक्तीचे हितसंबंध विचारात घेण्यापुरतीच मर्यादित असेल.

खुल्या न्यायालयात कामकाज चालणे

**१३.** अशी प्रत्येक कार्यवाही, खुल्या न्यायालयात चालविली जाईल आणि राज्यातील कोणत्याही दिवाणी न्यायालयात व्यवसाय करण्याचा हक्क असलेल्या सर्व व्यक्तींना अशा कार्यवाहीत यथास्थिती, हजर राहण्याचा, खटला चालविण्याचा किंवा कृती करण्याचा हक्क असेल.

**रक्कम ठरविताना जिल्हा न्यायालयाने विचारात घ्यावयाची बाब**

**१४.** प्रदानाची रक्कम ठरविताना, जिल्हा न्यायालय कलम ८ च्या पोटकलम (३) च्या तरतुदी विचारात घेईल, परंतु ज्या प्राप्तीच्या संबंधात, अशा व्यक्तीने नेमलेल्या दिवसापूर्वी हिशेब ठेवला नसेल अशा कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस जी मिळाल्याचे अभिकथित असेल अशी कोणतीही प्राप्ती, कलम ४ अन्वये नाहीसे करण्यात आलेले आणि संपादन करण्यात आलेले उक्त व्यक्तीचे आनुवंशिक हक्क आणि विशेषाधिकार यांपासून त्या व्यक्तीला कायदेशीररित्या मिळालेल्या उत्पन्नाच्या रकमेबाबत जिल्हा न्यायालयाची त्याच्यापुढे सादर केलेल्या पुराव्यावरून खात्री झाल्याखेरीज विचारात घेणार नाही.

**आदेशांचे स्वरूप**

**१५.** (१) जिल्हा न्यायालयाने दिलेला प्रत्येक आदेश लेखी असेल व त्यावर न्यायाधीशाची सही असेल आणि उक्त रक्कम देण्यासंबंधीच्या कारणासह देण्याचा आदेश दिलेली रक्कम, त्यामध्ये विनिर्दिष्ट करील.

(२) असा प्रत्येक आदेश हुकूमनामा असल्याचे समजण्यात येईल आणि अशा आदेशाच्या कारणांचे निवेदन हे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे अनुक्रमे कलम २, खंड (२) आणि कलम २, खंड (९) याच्या अर्थानुसार न्यायनिर्णय असल्याचे समजण्यात येईल. १९०८ चा ५

**कार्यवाहीचा खर्च**

**१६.** अशा प्रत्येक आदेशात, या प्रकरणाखालील कार्यवाहीमध्ये आलेल्या खर्चाची रक्कम आणि ती कोणत्या व्यक्तीकडून आणि किती प्रमाणात देण्यात यावी हेदेखील नमूद करील.

**अपील**

**१७.** या अधिनियमाखालील जिल्हा न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध, जणू असा निर्णय हा ज्याविरुद्ध सामान्यतः अपील सादर करता येते असा हुकूमनामा असल्याप्रमाणे, उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल.

**रक्कम देणे किंवा ती न्यायालयात जमा करणे**

**१८.** (१) कलम ७ अन्वये किंवा ८ अन्वये आदेश देण्यात आल्यानंतर, प्राधिकृत अधिकारी राज्य शासनाने याबाबत पुरविलेल्या पैशांमधून त्याने आदेश दिला असेल अशी रक्कम आदेशानुसार ती मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तींना देईल आणि पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही एका किंवा अधिक आकस्मिक घटनांमुळे प्रतिबंध झाला नाही तर ती रक्कम त्यांना देईल.

(२) ती रक्कम स्वीकारण्यास त्यांनी संमती दिली नाही किंवा ती रक्कम मिळण्यासंबंधातील एखाद्या व्यक्तीच्या पात्रतेसंबंधी किंवा रकमेच्या संविभाजनासंबंधी कोणताही विवाद असेल तर, प्राधिकृत अधिकारी ती रक्कम. जिल्हा न्यायालयात जमा करील :

परंतु, हितसंबंध असल्याचे मान्य करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस. रकमेच्या पर्याप्ततेबद्दल निषेध नोंदवून अशी रक्कम घेता येईल :

आणखी असे की, निषेध नोंदवून असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे रक्कम स्वीकारणाऱ्या व्यक्तीला, कलम ९ खाली कोणताही अर्ज करण्याचा हक्क असणार नाही :

तसेच, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे या अधिनियमाखाली जिला कोणत्याही रकमेचा संपूर्ण किंवा कोणताही भाग मिळेल अशा व्यक्तीने त्या रकमेवर कायदेशीर हक्क असणाऱ्या व्यक्तीला ती देण्याच्या संबंधातील तिच्या दायित्वावर, कोणताही परिणाम होणार नाही.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्राधिकृत अधिकारी या कलमान्वये चुकत्या केलेल्या किंवा भरणा केलेल्या एकूण रकमेपैकी, राज्य शासन याबाबतीत निर्धारित करील असा भाग, मंदिर निधीतून राज्य शासनाला देण्यात येईल. आणि त्याबाबतीत राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत आणि अशा दराच्या व्याजासह, असा भाग समितीद्वारे देण्यात येईल.

**१९.** या अधिनियमाखाली जिल्हा न्यायालयात कोणताही पैसा भरणा करण्यात आला असेल तेव्हा, जिल्हा न्यायालयास हितसंबंधित किंवा अशा पैशात हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावर, तो पैसा त्यास योग्य वाटेल अशा शासकीय किंवा इतर मान्यताप्राप्त रोख्यांमध्ये गुंतविण्याबद्दल आदेश देता येईल आणि त्यातील हितसंबंधित पक्षकारांनी पैशांची स्वतःच असा पैसा गुंतविला असता तर त्यांना जो लाभ मिळाला असता तोच लाभ त्याच्या मते त्यांना मिळेल अशा रीतीने, अशा कोणत्याही गुंतवणुकीपासून मिळणारे व्याज किंवा इतर उत्पन्न जमा करण्याबद्दल व ते देण्याबद्दल निदेश देता येईल. इतर प्रकरणामध्ये भरणा केलेल्या पैशांची गुंतवणूक

**२०.** कलम १८ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे रक्कम देण्यात किंवा जमा करण्यात येणार नाही तेव्हा, प्राधिकृत अधिकारी त्याने आदेश दिलेली रक्कम, आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवस ज्या दिनांकास संपत असतील त्या दिनांकापासून ती अशा रीतीने देण्यात किंवा जमा करण्यात येईल तोपर्यंत, दरसाल दर शेकडा चार टक्के या दराने त्यावरील व्याजासह देईल. व्याज देणे

## प्रकरण तीन

### समिति

**२१.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पुढील बारा सदस्यांची मिळून होणारी एक समिती स्थापन करता येईल :— समिती स्थापन करणे

(क) विठ्ठल व रुक्मिणी यांचे जे भक्त आहेत आणि त्यांच्या नेमणुकीपूर्वी शासनाने ठरवून दिलेल्या नमुन्यात जे प्रतिज्ञापन करतील अशा, सामान्यतः या राज्यात राहणाऱ्या व्यक्तींमधून, राज्य शासनाने नेमावयाचे अध्यक्षासह, अकरा सदस्य.

(ख) पंढरपूर नगरपालिकेचा अध्यक्ष पदसिद्ध, जर तो विठ्ठल रुक्मिणीचा भक्त असेल आणि उपरोक्तप्रमाणे त्याने प्रतिज्ञापन केले असेल, आणि या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये तो निरर्ह ठरला नसेल तर, आणि तो निरर्ह असेल किंवा राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत त्याने तसे प्रतिज्ञापन केले नसेल तर, जो निरर्ह नसेल व जो असे प्रतिज्ञापन करील असा, राज्य शासनाने नेमावयाचा, नगरपालिकेचा सदस्य;

परंतु कलम २३, पोट-कलम (१) याच्या परंतुकाखालील निरर्हता ही, अध्यक्षाच्याबाबतीत लागू असणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली रीतसर समिती स्थापन करण्यात येईपर्यंत, राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ याबाबतीत राज्य शासनाने नेमलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींची मिळून झालेल्या, एका अस्थायी समितीची नेमणूक करता येईल. त्यांच्यापैकी एका व्यक्तीस, तिचा सभापती म्हणून नेमता येईल, पोट-कलम (१) खाली समिती स्थापन करण्यात आल्यावर अस्थायी समिती ज्या सदस्यांची मिळून झाली असेल ते सदस्य आपली अधिकारपदे सोडतील आणि अस्थायी समिती या अधिनियमाखालील कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचे किंवा कर्तव्ये पार पाडण्याचे बंद करील आणि तिच्याकडे निहित असलेली सर्व मालमत्ता आणि दाननिधी आणि नोंदलेल्या विश्वस्तव्यवस्थांचे व्यवस्थापन, पोट-कलम (१) खाली रीतसर स्थापन केलेल्या समितीच्या हाती सुपूर्द करील.

(३) ही समिती ''श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती'' या नावाचा एक निगम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा व एक सामाईक शिक्का असेल आणि तिला, मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि तिला तिच्या कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत उक्त नावाने दावा करता येईल किंवा तिच्यावर दावा लावता येईल.

सदस्यांची निरर्हता

**२२.** एखादी व्यक्ती--

(क) विकल मनाची असेल आणि ती तशी असल्याचे एखाद्या सक्षम न्यायालयाने घोषित केले असेल;

(ख) ती अमुक्त दिवाळखोर असेल;

(ग) ती अज्ञान असेल;

(घ) ती समितीच्या अधीन असलेले कोणतेही लाभपद धारण करीत असेल;

(ङ) समितीच्या आदेशाद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही कामात किंवा समितीबरोबर किंवा समितीद्वारे किंवा समितीच्या वतीने असलेल्या कोणत्याही संविदेत, तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदारांमार्फत, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल;

(च) ती समितीसाठी किंवा तिच्याविरुद्ध विधि व्यवसायी म्हणून काम करीत असेल;

(छ) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा कोणत्याही अपराधाबद्दल ती सिद्धापराध ठरली असेल;

(ज) ती हिंदू धर्माची अनुयायी नसेल,

तर सदस्य म्हणून नेमली जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास निरर्ह ठरविण्यात येईल.

शासनाने सदस्यांची नेमणूक करणे

**२३.** (१) नेमणुका करताना राज्य शासन--

(क) राज्य विधानमंडळाच्या दोन सदस्यांची (त्यांच्यापैकी एक महाराष्ट्र विधानसभेचा व दुसरा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य असेल) नेमणूक करण्याची; आणि

(ख) किमान एका महिलेची व ज्यांच्यापैकी किमान एक अनुसूचित जातीची व एक अनुसूचित जमातीची व्यक्ती असेल अशा, सर्वसाधारणतः या राज्यात राहणाऱ्या व्यक्तीमधून दोन सदस्यांची नेमणूक करण्याची काळजी घेईल;

परंतु, कलम ६ किंवा कलम ८ अन्वये रकमेची मागणी करण्याचा जिला हक्क आहे अशा कोणत्याही व्यक्तीची नेमणुकीच्या दिनांकापासून १५ वर्षाच्या कालावधीसाठी, समितीवर नेमणूक करता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये नेमण्यात आलेली व्यक्ती, ती महाराष्ट्र विधानसभेची किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेची सदस्य म्हणून असण्याचे बंद झाल्यास समितीची सदस्य म्हणून असण्याचेसुद्धा बंद होईल.

(३) सदस्य असण्याचे बंद होणारी व्यक्ती, कलम २२ अन्वये निरर्ह नसेल तर फेरनेमणुकीस पात्र असेल.

राज्य शासनाने नेमलेल्या सदस्यांचा पदावधी

**२४.** राज्य शासनाने नेमलेले सदस्य, कलम २१ पोट-कलम (१) खालील अधिसूचना ज्या दिनांकास **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल त्या दिनांकाच्या प्रारंभापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी अधिकारपद धारण करतील :

परंतु, अशा मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, नवीन समिती स्थापन करणारी अधिसूचना ज्या दिनांकास **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल त्या दिनांकापर्यंत वाढविण्यात आल्याचे आणि त्या दिनांकास तो समाप्त झाल्याचे समजण्यात येईल.

सदस्य व सभापती यांचा राजीनामा

**२५.** राज्य शासनाने नेमणूक केलेल्या कोणत्याही सदस्यास, आपल्या सहीने अध्यक्षास उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल आणि अध्यक्षास. राज्य शासनास तशाच प्रकारची नोटीस देऊन आपल्या अध्यक्षपदाचा किंवा सदस्यत्वाचा राजीनामा देता येईल; आणि यथास्थिती, अध्यक्षाने किंवा राज्य शासनाने असा राजीनामा स्वीकारल्यानंतर सदस्याचे, किंवा सभापतीचे अधिकारपद रिकामे होईल. ही नोटीस विहित रीतीने देण्यात येईल.

२६. (१) राज्य शासनास या कलमाच्या तरतुदीस अधीन राहून, उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या कमीत कमी दोन-तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा असलेल्या समितीच्या शिफारशीवरून कोणत्याही सदस्यास, आपली कर्तव्ये पार पाडताना गैरवर्तणूक केल्याबद्दल (विश्वासघात, निष्काळजीपणा, निधीचे अपयोजन किंवा अफरातफर याबद्दल किंवा दाननिधी किंवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या कोणत्याही मालमत्तेची किंवा मंदिर निधीची हानी केल्याबद्दल नुकसानी केल्याबद्दल किंवा तिचा अपव्यय केल्याबद्दल दोषी ठरत असेल ती गोष्ट धरून) किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तणुकीबद्दल किंवा दाननिधी नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या किंवा मंदिरातील कोणत्याही देवदेवतांच्या दर्शनाकरिता पंढरपूरला भेट देणारे भक्त किंवा यात्रेकरू यांच्या, हितसंबंधास कोणत्याहीरीतीने बाधक होणारी कृती केल्याबद्दल, दोषी ठरेल किंवा सदस्य म्हणून आपल्या कर्तव्यांचे पालन करण्यास असमर्थ होईल तर, काढून टाकता येईल : गैरवर्तणूक इत्यादीबद्दल सदस्यांना काढून टाकणे

परंतु, अशा कोणत्याही सदस्यास, त्यास आपले स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, आणि धर्मादाय आयुक्तांचे म्हणणे ऐकून घेतल्याखेरीज अधिकारपदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(२) अशा सदस्याला समितीमधून काढून टाकताना, राज्य शासनाने, अशा रीतीने काढून टाकलेल्या सदस्यांची कृती किंवा वर्जन यामुळे झालेली हानी निर्धारित करणे आणि त्याच्याकडून ती जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्याचे निदेश देणे कायदेशीर असेल.

(३) अशी शिफारस मिळाल्यानंतर, न्याय्य व पुरेशा कारणावरून राज्य शासनाने त्या प्रकरणाचा अंतिम निर्णय होईपर्यंत अशा सदस्यास समितीतून निलंबित करणे कायदेशीर असेल.

(४) एखाद्या सदस्यास काढून टाकल्यानंतर किंवा निलंबित केल्यानंतर, राज्य शासनास, अशा सदस्याने धारण केलेली कोणतीही पुस्तके, हिशेब व दाननिधी किंवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था किंवा मंदिर निधी यांचा भाग असणाऱ्या कोणत्याही मालमत्तेचा कब्जा, ताबडतोब सुपूर्द करण्याबद्दल निदेश देता येतील.

(५) राज्य शासनाने या कलमान्वये दिलेला कोणताही आदेश किंवा निदेश हा अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही दिवाणी न्यायालयात आक्षेप घेतला जाणार नाही.

२७. (१) जर कोणताही सदस्य, त्याच्या पदावधीमध्ये— पदावधीच्या काळातील सदस्यांची निरर्हता

(क) कलम २२ खाली निरर्ह ठरत असेल, किंवा

(ख) त्या समितीच्या परवानगीशिवाय, तिच्या लागोपाठ तीन बैठकींना अनुपस्थित राहील, तर अशा सदस्यांचे अधिकारपद रिकामे होईल.

(२) या कलमाखाली एखादे पद रिकामे झाले आहे किंवा नाही याबद्दल कोणताही प्रश्न उपस्थित करण्यात आला तर, राज्य शासन त्या प्रश्नाचा निर्णय करील; आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल. पद रिकामे झाले असल्याबद्दल राज्य शासन निर्णय देईतोपर्यंत अशा सदस्यास सदस्य म्हणून चालू राहण्यास असमर्थ ठरविता येणार नाही :

परंतु कोणत्याही सदस्यास, त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज त्याच्याविरुद्ध कोणताही निर्णय देण्यात येणार नाही.

२८. सदस्याच्या मृत्यूमुळे, राजीनाम्यामुळे, निरर्हतेमुळे किंवा त्यास काढून टाकल्यामुळे किंवा त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी अथवा अन्यथा, एखादा सदस्य काम करण्यास असमर्थ झाल्यामुळे, एखादे पद रिकामे झाल्यास कार्यकारी अधिकारी ताबडतोब त्याबाबतीत राज्य शासनास कळविल आणि असे रिकामे पद, सोयीनुसार, शक्यतो लवकर त्यावर एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून भरण्यात येईल आणि त्या व्यक्तीची ज्या सदस्याच्या जागी नेमणूक करण्यात आली असेल त्या सदस्याचे पद रिकामे झाले नसते तर, त्याने जोवर उक्त पद धारण केले असते तोपर्यंतच ती व्यक्ती ते पद धारण करील : तात्पुरती रिकामी झालेली पदे कशी भरावीत

परंतु त्या सदस्याचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होत असेल त्या दिनांकापूर्वीच्या सहा महिन्यांच्या आत एखादे पद रिकामे झाल्यास ते पद भरता येणार नाही.

**सदस्यांचे पारिश्रमिक**

**२९.** (१) प्रत्येक सदस्यांस, विहित करण्यात येईल असे मानधन आणि ज्या ठिकाणी समितीच्या सभा घेण्यात येतील किंवा कामकाज चालविण्यात येईल त्या ठिकाणी समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी किंवा अध्यक्ष अथवा सदस्य या नात्याने असलेले कोणतेही कामकाज चालविण्यासाठी आणि अशा ठिकाणाहून परतीच्या प्रवासासाठी, विहित करण्यात येईल असा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील कोणताही भत्ता किंवा मानधन मिळण्यास जो पात्र आहे असा राज्य विधानमंडळाचा एखादा सदस्य, समितीच्या सदस्याचे अधिकारपद धारण करीत असताना, राज्य विधानमंडळाचा सदस्य म्हणून चालू राहण्यास निरर्ह असणार नाही.

**समितीचे कार्यालय व तिच्या सभा**

**३०.** (१) समितीचे कार्यालय पंढरपूर येथे असेल.

(२) समितीचे कामकाज चालविण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा कालांतरानी पंढरपूर येथे तिची सभा घेण्यात येईल.

(३) समिती अशा सभांच्या कामकाजासंबंधी आणि त्या तहकूब करण्यासंबंधी व समितीच्या अशा सभा किंवा विशेष सभा घेण्यासंबंधीच्या सर्व बाबी धरून, तीमधील कामकाजासंबंधी सामान्यपणे या अधिनियमाशी सुसंगत असतील असे उप-विधी तयार करील.

(४) सहा सदस्य असल्यास समितीच्या सभेची गणपूर्ती होईल.

(५) सभापती हा, समितीच्या प्रत्येक सभेच्या अध्यक्षपदी असेल व त्याच्या अनुपस्थितीत, उपस्थित असलेल्या सदस्यांकडून अध्यक्षपदासाठी, निवडण्यात येईल असा सदस्य, अध्यक्षपदी असेल.

(६) समितीच्या सभेत उपस्थित होणाऱ्या सर्व प्रश्नांचा, उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय करण्यात येईल व समसमान मते पडतील त्याबाबतीत सभापती किंवा अध्यक्षपदी असलेल्या व्यक्तीस निर्णायक मत असेल व तो त्याचा वापर करेल.

**दोष किंवा जागा रिकामी राहणे यामुळे कृती विधि-अग्राह्य न ठरणे**

**३१.** समितीची किंवा समितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची कोणतीही कृती किंवा कामकाज हे, समितीच्या सदस्यामध्ये एखादी जागा रिकामी आहे किंवा तिच्या रचनेत दोष आहे तसेच समितीच्या सभापतीस किंवा कोणत्याही सदस्यास मत देण्याचा किंवा कोणत्याही निरर्हतेमुळे किंवा त्याच्या नेमणुकीतील कोणत्याही नियमबाह्यतेमुळे, किंवा बेकायदेशीरपणामुळे सभापती म्हणून किंवा सदस्य म्हणून अधिकार पदावर चालू राहण्याचा अधिकार नव्हता याच केवळ कारणावरून विधिअग्राह्य असल्याचे समजण्यात येणार नाही.

**समितीचे अधिकार व कर्तव्ये**

**३२.** (१) समितीला पुढील अधिकार असतील--

(क) या कलमान्वये तिच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडणे;

(ख) अन्य कोणत्याही व्यक्तीस संपूर्णतः वगळून, मंदिरातील दैनिक उपायने, दक्षिणा, भोग, देणग्या, वर्गण्या व तशाच प्रकारच्या वस्तू गोळा करणे व त्याची आणि मंदिरांचा निधी, कोणतेही किंमती दस्तऐवज असल्यास ते व जडजवाहीर आणि अलंकार यांची सुरक्षित अभिरक्षा सुनिश्चित करणे, व समितीस योग्य वाटेल अशा उपायनांचा विनियोग करणे;

(ग) मंदिरासाठी दाननिधी स्वीकारणे;

(घ) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांच्या महसुलात वाढ करण्याच्या प्रयोजनार्थ, कोणतीही योजना तयार करणे व ती कार्यान्वित करणे;

(ङ) दाननिधीच्या व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांच्या मालमत्तेचे यथोचित व्यवस्थापन व प्रशासन सुनिश्चित करण्याच्यादृष्टीने, त्यांची माहिती काढणे. व त्या मिळविण्यासाठी व कब्जात घेण्यासाठी उपाय योजणे;

(च) दाननिधीच्या किंवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांच्या कोणत्याही मालमत्तेचा विनियोग करणे व धर्मादाय आयुक्तांच्या पूर्वमंजुरीने, त्या मंजुरीत संमत करण्यात येतील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने, पैसे कर्जाऊ घेणे;

(छ) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थां यांच्या प्रशासनाच्या व व्यवस्थापनाच्या संबंधातील बाबींवर समितीला सल्ला देण्यासाठी, सदस्यांमधून किंवा सदस्य नसलेल्या व्यक्तींमधून उप-समित्या तयार करणे व अशा उप-समित्यांच्या सदस्यांना भत्ते देण्यासंबंधीची तरतूद धरून, त्यांची रचना, कार्यपद्धती व सभा यांच्या कामकाजाबाबत, तसेच त्याच्याशी संबंधित, असणाऱ्या बाबींची तरतूद करणे;

(ज) एक सामाईक योजना तयार करण्यासाठी नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांचे एकत्रीकरण करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा एखाद्या नवीन विश्वस्तव्यवस्थेत भर घालण्याच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही एकत्रीकृत योजनांमध्ये फेरबदल करण्यासाठी धर्मादाय आयुक्तांशी बोलणी करणे;

(झ) समितीच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निवड करणे;

(ञ) पंढरपूर मंदिराशी संबंधित असतील अशा इतर विश्वस्तव्यवस्थामधून, दाननिधींमधून किंवा कोणत्याही परिसंस्थामधून (एक तर व्यवस्थापन किंवा परिरक्षण अथवा दोन्ही स्वरूपात) विश्वस्त म्हणून स्वीकार करणे;

(ट) विठ्ठल व रुक्मिणी मंदिरामध्ये किंवा त्यांच्या आसपास, शांततापूर्ण व धार्मिक वातावरण निर्माण व्हावे म्हणून विकास करण्याच्या व योजना पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असलेल्या जमिनी किंवा इमारती संपादन करणे किंवा त्या खरेदी करणे;

(ठ) हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम व उपविधी याअन्वये तरतूद करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे;

(२) हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींच्या अधीनतेने समितीची पुढीलप्रमाणे कर्तव्ये असतील :—

(क) मंदिरामधील नित्य म्हणजेच दैनंदिन व नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक सेवा यथोचितरित्या पार पाडण्यासंबंधी व सर्वसाधारणपणे किंवा विशेष प्रसंगी, त्यामधील समारंभ, उत्सव व महोत्सव यथोचितरीत्या पार पाडण्यासंबंधी व्यवस्था करणे व नैमित्तिक पूजा करण्यासाठी दक्षिणा निश्चित करणे;

(ख) कोणतीही फी न घेता विठ्ठल व रुक्मिणी आणि सर्व परिवार देवता यांच्या भराभर व शांततापूर्ण दर्शनाची व मंदिरास भेट देणाऱ्या भक्तजनांच्या किंवा यात्रेकरूंच्या पूजेची (पूजेच्या व प्रसादाच्या वस्तू उपलब्ध करण्याच्या तरतुदीसह) समितीकडून याबाबतीत वेळोवेळी ठरविण्यात येईल अशा रास्त अटींवर सोय करणे;

(ग) मंदिराच्या व मंदिरास भेट देणाऱ्या भक्तजनांच्या व यात्रेकरूंच्या हिताच्यादृष्टीने समितीकडे निहित झालेल्या मालमत्तांचे परिरक्षण, विकास व व्यवस्थापन सुनिश्चित करणे;

(घ) मंदिरामध्ये सुव्यवस्था व शिस्त आणि योग्य ते आरोग्यप्रद वातावरण राहील आणि स्वच्छताविषयक योग्य तो दर्जा ठेवण्यात येईल आणि अर्पण करण्यात येणारी उपायने शुद्ध असतील हे सुनिश्चित करणे;

(ङ) दाननिधीचे व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांचे निधी असल्यास ते शक्यतोवर देणगीदारांची इच्छा माहीत असेल तर त्याप्रमाणे. खर्च करण्यात येत आहेत हे सुनिश्चित करणे;

(च) समितीच्या वेतनी कर्मचाऱ्यांस यथोचित वित्तलब्धी देण्याची तरतूद करणे;

(छ) ज्यांनी मानवतावाद व सामाजिक समता यासंबंधी उपदेश केला अशा सर्व संतांच्या शिकवणुकीतील भावार्थ, सिद्धांत व तत्त्वज्ञान यासंबंधीचे ज्ञान देण्यासाठी, ते आचरणात आणण्यासाठी, शिक्षण देण्यासाठी तसेच त्याचा प्रचार करण्यासाठी व विशेषतः वारकरी संप्रदायाच्या संत वाङ्मयाचे व भागवत धर्माचे संशोधन व अभ्यास करण्यासाठी व त्यास प्रसिद्धी देण्यासाठी व त्यांचा प्रचार करण्यासाठी तुकाराम महाराज संतपीठ या नावाची परिसंस्था स्थापन करणे;

(ज) या अधिनियमान्वये स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करणे; व

(झ) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था त्यांच्या सक्षम प्रशासनासाठी, व्यवस्थापनासाठी व नियमनांसाठी तसेच मंदिरास भेट देणाऱ्या भक्तांच्या व यात्रेकरूंच्या सोयीसाठी व आध्यात्मिक लाभासाठी आनुषंगिक व हितावह असतील अशा गोष्टी करणे.

## प्रकरण चार

### कार्यकारी अधिकारी व आस्थापना

कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक

**३३.** [1][(१) राज्य शासन या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक करील; आणि तो–

(क) नेमणुकीच्यावेळी अन्यथा ठरवण्यात आले नसेल तर, किंवा

(ख) राज्य शासनाने, त्यास त्याच्या अधिकारपदावरून काढून टाकले नाही तर, तीन वर्षांच्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करील];

(२) कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकारपद तात्पुरते रिकामे होईल तेव्हा, ते अधिकारपद राज्य शासनाला भरता येईल.

[2][(३) मावळता कार्यकारी अधिकारी फेरनेमणुकीसाठी पात्र असेल.]

कार्यकारी अधिकाऱ्या-च्या अर्हता व सेवेच्या शर्ती

**३४.** (१) कार्यकारी अधिकारी हा, राज्य शासनाच्या क्रियाशील सेवेत असलेल्या व्यक्तींमधून अशा सेवेमधून निवृत्त झालेल्या व्यक्तींमधून (अशी व्यक्ती सहायक किंवा उपजिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी किंवा राज्य शासनाच्या मते समान दर्जाची असेल असा अधिकारी असेल) निवडण्यात येईल व ती हिंदू धर्माची अनुयायी असेल तसेच ती विठ्ठल व रुक्मिणीदेवी यांची भक्त असेल व या प्रयोजनार्थ राज्य शासनाने ठरवून दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापन करील.

[3][ती राज्य शासनाच्या क्रियाशील सेवेतील व्यक्ती असेल तर तिची एकतर आपली स्वतःची कर्तव्ये सांभाळून किंवा समितीचा पूर्ण वेळ अधिकारी म्हणून, कार्यकारी अधिकाऱ्याच्या पदावर नेमणूक करता येईल. जर ती व्यक्ती समितीचा पूर्ण वेळ अधिकारी असेल तर समितीच्या परवानगीशिवाय तिच्या अधिकारपदाशी संबंधित नसलेले कोणतेही काम ती करणार नाही.]

(२) राज्य शासनास, एकतर स्वाधिकारे किंवा समितीने पारित केलेल्या ठरावाच्या आधारे, कार्यकारी अधिकाऱ्याला त्याच्या अधिकारपदावरून निलंबित करता येईल किंवा काढून टाकता येईल.

कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कर्तव्ये

**३५.** (१) कार्यकारी अधिकारी हा, समितीचा सचिव व तिचा मुख्य अधिकारी असेल. आणि समितीचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण याच्या अधीनतेने त्यास, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समितीचे निर्णय व आदेश पार पाडण्याचे अधिकार असतील.

(२) या कलमाच्या पोट-कलम (१) किंवा कलम ५, पोट-कलम (१) खंड (ग) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांचे सर्व अभिलेख व मालमत्ता याच्या अभिरक्षेसाठी कार्यकारी अधिकारी जबाबदार असेल व तो मंदिरामध्ये देण्यात येणारी उपायने, दक्षिणा, भोग किंवा भेटी व तत्सम बाबी योग्य प्रकारे जमा करण्याची व्यवस्था करील आणि त्यास––

---

[1] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ४ (अ) द्वारे मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) द्वारे, पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

(क) समितीने निवडलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करणे;

(ख) सर्वसाधारणपणे पट्ट्याने देण्यात येतात अशा, दाननिधीच्या व विश्वस्तव्यवस्थांच्या जमिनी व इमारती एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी पट्ट्याने देणे;

(ग) बांधकामे किंवा पुरवठा यांसाठी निविदा मागविणे व त्याची रक्कम किंवा मूल्य पाच हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा, अशी निविदा स्वीकारणे;

(घ) निकडीच्या दुरुस्तीसंबंधी आदेश देणे;

(ङ) समितीच्या कर्मचाऱ्यांमधील विवादांचा निर्णय करणे :

परंतु खंड (क), (ख) व (ग) याखालील अधिकारांचा वापर हा, त्याबाबतीत समितीने विशेषरित्या कोणतेही निदेश दिलेले असल्यास त्या निदेशास अधीन असेल.

(३) कार्यकारी अधिकाऱ्याच्या पोट-कलम (२) खंड (ङ) खालील निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशा कालावधीत, समितीकडे अपील करण्याचा हक्क असेल व समितीचा निर्णय हा सक्षम न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयान्वये, हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये रद्द करण्यात आला नाही तर, अंतिम असेल.

कार्यकारी अधिकाऱ्याचे असाधारण अधिकार

**३६.** कार्यकारी अधिकाऱ्यास, निकडीच्या प्रकरणामध्ये, ज्या कोणत्याही बांधकामासाठी किंवा एखाद्या कृतीसाठी त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली नसेल व जी तातडीने पार पाडणे व पूर्ण करणे हे दाननिधी नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा मंदिरास भेट देणाऱ्या भक्तजनांच्या व यात्रेकरूंच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी किंवा मंदिरामध्ये पूजा व इतर धार्मिक विधी योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी, त्याच्या मते आवश्यक असेल, अशा कोणत्याही बांधकामाबाबत किंवा कोणतीही कृती करण्याबाबत निदेश देता येईल, तसेच अशी कामे पार पाडण्याचा किंवा अशी कृती करण्यासंबंधीचा खर्च, मंदिराच्या निधीमधून देण्याबाबत निदेश देता येईल. कार्यकारी अधिकारी या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीबाबत व त्यासंबंधीच्या कारणांबद्दल समितीस ताबडतोब कळविले. समितीच्या निर्णयासह अशा अहवालाची एक प्रत व समितीचा काही अभिप्राय असेल तर त्यासह धर्मादाय आयुक्तामार्फत राज्य शासनास सादर करील.

आस्थापना अनुसूची

**३७.** [१][(१) नेमलेल्या दिवसानंतर कार्यकारी अधिकारी] त्याच्या मते समितीच्या आस्थापनेच्या रचनेत ज्यांचा अंतर्भाव असेल अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये, पदनामे व श्रेणी यासंबंधीची एक अनुसूची ताबडतोब तयार करून ती शक्य तितक्या लवकर समितीस सादर करील व त्यांना देय असलेले वेतन व भत्ते यांच्या संबंधातील आपले प्रस्ताव त्यामध्ये संनिविष्ट करील. अशा यादीमध्ये, जे आळीपाळीने किंवा विशिष्ट कालावधीसाठी, सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही विशेष प्रसंगी अशी कामे करतील अशा व्यक्तींची नावे व कोणत्याही कारणामुळे मंदिरामध्ये अशी कामे करता येणे ज्यास शक्य होणार नाही अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, बदली म्हणून, काम करणाऱ्या व्यक्तींची नावे, यांचाही समावेश असेल. अशी अनुसूची व यादी समितीची मान्यता मिळाल्यावर, अमलात येईल.

(२) समितीच्या मंजुरीने असेल त्याव्यतिरिक्त अशा अनुसूचीत व यादीत कोणताही बदल करता येणार नाही.

कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन व त्यांच्या सेवेच्या शर्ती

**३८.** (१) कार्यकारी अधिकाऱ्याला, त्याचे वेतन व भत्ते, राज्याच्या एकत्रित निधीमधून मिळेल. तो राज्य शासनाचा कर्मचारी असेल, तसेच त्याच्या सेवेच्या शर्ती, राज्य शासनाकडून ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

(२) या अधिनियमान्वये नेमणूक करण्यात आलेले इतर अधिकारी, कर्मचारी व इतर व्यक्ती या, समितीचे अधिकारी व कर्मचारी असतील व इतर अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते धरून त्यांच्या सेवेच्या शर्ती या, राज्य शासनाच्या मान्यतेने, समितीकडून ठरविण्यात येतील त्याप्रमाणे असतील व त्यांचे वेतन व भत्ते मंदिर निधीतून देण्यात येतील.

(३) कार्यकारी अधिकाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन, रजा व इतर भत्ते याबद्दल राज्य शासनाकडून ठरविण्यात

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ च्या कलम ६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

येईल असा खर्च, मंदिर निधीमधून प्रत्येक वर्षी, राज्य शासनास देण्यात येईल.

मंदिरांच्या आवारात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या प्रयोजनार्थ, कार्यकारी अधिकाऱ्याने जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणे व त्याची कर्तव्ये पार पाडणे

**३९.** राज्य शासन **राजपत्रातील** आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत किंवा कालावधीमध्ये, व त्यास योग्य वाटेल अशा इतर रीतीने, कार्यकारी अधिकारी, मंदिराच्या आवारामध्ये व सभोवतालच्या १.६ किलोमीटर परिसरात, कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याच्या प्रयोजनार्थ, [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] अन्वये जिल्हा दंडाधिकाऱ्यास अनुक्रमे जे अधिकार देण्यात आलेले आहेत व जी कर्तव्ये त्यांच्यावर लादण्यात आलेली आहेत, अशा सर्व अधिकारांचा वापर करील व अशी सर्व कर्तव्ये पार पाडील. १९७४ चा २

## प्रकरण पाच

### अर्थसंकल्प व लेखापरीक्षा

अर्थसंकल्प

**४०.** (१)कार्यकारी अधिकारी दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या, आगामी वर्षाच्या जमेचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज विहित रीतीने व नमुन्यात दरवर्षी तयार करील व ते समितीपुढे ठेवील व समितीस फेरबदलाशिवाय किंवा तिला योग्य वाटेल असे फेरबदल करून त्यास मान्यता देता येईल. समितीने मान्यता दिल्यानंतर, तो अर्थसंकल्प, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, धर्मादाय आयुक्तांकडून त्याबाबतीत निश्चित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी धर्मादाय आयुक्तास मंजुरीसाठी सादर करण्यात येईल.

(२) अर्थसंकल्प मंजूर करण्यापूर्वी, धर्मादाय आयुक्त, मंदिराच्या निधीमध्ये विहित कामचलाऊ शिल्लक राखण्यासाठी व दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांची सर्व दायित्वे भागविण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली आहे याबद्दल आपली स्वतःची खात्री करून घेईल. धर्मादाय आयुक्तास सादर केलेल्या अर्थसंकल्पात या तरतुदी करण्यात आल्या नसतील तर, धर्मादाय आयुक्तास, अशा तरतुदी केल्या जाव्यात यासाठी अर्थसंकल्पाच्या कोणत्याही भागात फेरबदल करता येईल. कोणतेही फेरबदल असल्यास त्यास अधीन राहून अर्थसंकल्प मंजूर करणारा धर्मादाय आयुक्ताचा निर्णय, अर्थसंकल्प ज्या वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षाच्या प्रारंभाच्या किमान पंधरा दिवस अगोदर समितीला कळविण्यात येईल व पूर्ववर्ती वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी याप्रमाणे कळविण्यात आले नाही तर, अर्थसंकल्प या कलमानुसार मंजूर करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल. धर्मादाय आयुक्ताने कोणतेही फेरबदल केल्यास ते समितीवर बंधनकारक असतील.

सुधारित किंवा पूरक अर्थसंकल्प

**४१.** कोणत्याही वर्षात अर्थसंकल्पात दर्शविलेल्या जमेच्या किंवा खर्चाच्या आकड्यांमध्ये फेरबदल करणे आवश्यक आहे असे समितीस आढळून आले तर, समितीस, धर्मादाय आयुक्तास पुरवणी किंवा सुधारित अर्थसंकल्प सादर करता येईल व अशा पूरक अर्थसंकल्पाच्याबाबतीत कलम ४० च्या तरतुदी लागू होतील.

**४२.** धर्मादाय आयुक्त राज्य शासनाच्या मान्यतेने, दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ७ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

लेख्यांची, विहितरीतीने लेखापरीक्षा करण्यासाठी; प्रत्येक वर्षी, लेखापरीक्षकाची नेमणूक करील व त्याचे लेखापरीक्षा. पारिश्रमिक निश्चित करील व असे पारिश्रमिक अशा लेखापरीक्षकास मंदिर निधीमधून देण्यात येईल. लेखापरीक्षक आपला अहवाल समितीस सादर करील व त्या अहवालाची एक प्रत धर्मादाय आयुक्तास पाठवील आणि धर्मादाय आयुक्तास, त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील व समिती अशा निदेशाचे पालन करील.

## प्रकरण सहा

### सर्वसाधारण

**४३.** "पंढरपूर मंदिर निधी" या नावाने ओळखला जाणारा एक निधी स्थापन करण्यात येईल व तो समितीकडे निहित करण्यात येईल व समितीकडून त्याचे व्यवस्थापन व प्रशासन करण्यात येईल व त्यात पुढील बाबींचा समावेश होईल :— मंदिर निधी.

(क) मंदिरातील देवतांपुढे मिळालेली किंवा गोळा केलेली, रोख रकमांच्या स्वरूपात मिळालेली उपायने. किंवा वस्तुरूपाने मिळालेली उपायने यांचा लिलाव करून किंवा अन्यथा मिळालेले विक्री उत्पन्न;

(ख) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या स्थावर व जंगम मालमत्तापासून मिळालेले उत्पन्न;

(ग) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांसाठी किंवा त्यांच्या वतीने समितीस किंवा तिच्या कोणत्याही सदस्यास मिळालेल्या किंवा त्यांनी गोळा केलेल्या सर्व जमा रकमा. किंवा वसूल केलेल्या रकमा किंवा देणग्या;

(घ) अनुदान म्हणून किंवा कर्जाच्या स्वरूपात राज्य शासनाने दिलेली कोणतीही अंशदाने;

(ङ) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली लादण्यात आलेल्या दंडाच्या व शास्तीच्या सर्व रकमा;

(च) या अधिनियमाखाली वसूल करण्यात आलेल्या सर्व रकमा;

(छ) दाननिधी किंवा कोणतीही नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांस स्थानिक प्राधिकरणाने किंवा कोणतीही संस्था धरून कोणत्याही व्यक्तीने दिलेली कोणतीही भेटवस्तू देणगी किंवा अंशदान;

(ज) समितीकडे निहित असलेल्या स्थावर किंवा जंगम मालमत्तेचे विक्री उत्पन्न;

(झ) समितीने कोणत्याही कर्जाऊ रकमा घेतल्या असल्यास, त्या;

(ञ) समितीने हाती घेतलेल्या कोणत्याही परियोजनेखाली किंवा योजनेखाली तिला मिळालेल्या कोणत्याही जमा रकमा;

(ट) दाननिधी किंवा नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांसाठी किंवा त्यांच्या वतीने समितीला किंवा तिच्या कोणत्याही सदस्याला मिळालेल्या इतर रकमा किंवा पैसा.

**४४.** (१) मंदिर निधीचा वापर पुढील प्रयोजनासाठी करण्यात येईल :— मंदिर निधीचा वापर.

(क) मंदिराची दुरुस्ती धरून मंदिराचे परिरक्षण;

(ख) मंदिरातील नित्य म्हणजेच दैनंदिन किंवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक सेवा करण्यावरील खर्च;

(ग) मंदिरातील देवतांच्या दर्शनासाठी किंवा तेथे पूजा करण्यासाठी येणाऱ्या भक्तांसाठी किंवा पूजकांसाठी सुविधा पुरवणे;

(घ) मंदिराशी संबंधित सर्वसाधारणतः किंवा विशेष प्रसंगी धार्मिक कार्ये व उत्सव पार पाडणे;

(ङ) कलम ५३ अन्वये नेमण्यात आलेला अधिकारी धरून, अधिकारी व या अधिनियमान्वये नेमण्यात आलेले समितीचे कर्मचारी, यांना देय असलेले वेतन व भत्ते धरून भाडे, उपकर, कर, अंशदाने, आकार, विम्याचे हप्ते, प्रशासनिक खर्च देणे व या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या समितीच्या किंवा कोणत्याही उप-समितीच्या सदस्यांना मानधन व भत्ते देणे;

(च) कलम १८, पोट-कलम (३) अन्वये राज्य शासनाने निश्चित केलेल्या एकूण रकमेचा भाग परत करणे व कोणतीही शासकीय व इतर कर्जे असल्यास, त्यांची परतफेड करणे;

(छ) कलम ३८ पोट-कलम (३) खालील रक्कम देणे;

(ज) ज्यांनी मानवतावाद व सामाजिक समता यासंबंधी उपदेश केला अशा सर्व संतांच्या शिकवणुकीतील भावार्थ, सिद्धांत व तत्वज्ञान यासंबंधीचे ज्ञान देण्यासाठी, ते आचरणात आणण्यासाठी, शिक्षण देण्यासाठी तसेच त्याचा प्रचार करण्यासाठी व विशेषतः वारकरी संप्रदायाच्या संत वाङ्मयाचे व भागवत धर्माचे संशोधन व अभ्यास करण्यासाठी व त्यास प्रसिद्धी देण्यासाठी व त्यांचा प्रचार करण्यासाठी तुकाराम महाराज संतपीठ या नावाची परिसंस्था स्थापन करणे.

(२) समितीस मंदिर निधीचा वापर पुढीलपैकी कोणत्याही बाबींसाठी करता येईल :—

(क) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांचा विकास धरून त्यांचे व्यवस्थापन व प्रशासन;

(ख) व्यक्तींना मंदिरात पूजा व इतर धार्मिक समारंभ पार पाडण्याचे प्रशिक्षण देणे;

(ग) पूजक व मंदिरांना भेट देणारे यात्रेकरू किंवा भक्त यांच्यासाठी वैद्यकीय सहाय्य, पाणीपुरवठा व इतर स्वच्छताविषयक सोयींची तरतूद करणे आणि त्यांच्यासाठी (अन्न, दूध, कपडे यासह) इतर सुखसोयींची तरतूद करणे व वाजवी अटींवर त्यांच्या निवासासाठी इमारती बांधणे;

(घ) मंदिरांना भेट देणाऱ्या भक्तांसाठी किंवा यात्रेकरूंसाठी पूजेचे साहित्य व प्रसाद वाजवी दराने पुरवणे;

(ङ) धार्मिक पुस्तके व विविध धर्म व पंथ यांच्या तत्त्वप्रणालीसंबंधीचे लिखाण असलेले ग्रंथालय स्थापन करणे; आणि

(च) धर्मादाय आयुक्ताची मंजुरी घेऊन पंढरपूरच्या हद्दीत किंवा हद्दीबाहेर कोणतेही रुग्णालय, शाळा, अनाथाश्रम किंवा तशीच इतर संस्था स्थापणे व ती चालविणे किंवा तिला कोणतेही अनुदान किंवा अंशदान देणे.

निदेश देणे, अहवाल, दस्त-ऐवज इत्यादी मागविणे यासंबंधीचे राज्य शासनाचे अधिकार.

**४५.** (१) राज्य शासनास, समितीचे अधिकार व कर्तव्ये यांच्या संबंधात तिने अनुसरावयाच्या धोरणाच्या बाबतीत किंवा दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या प्रशासनाच्याबाबतीत किंवा त्यास सहाय्यभूत ठरणाऱ्या किंवा त्यांच्याशी आनुषंगिक असलेल्या कोणत्याहीबाबतीत व विशेषतः मंदिरातील किंवा मंदिरासंबंधातील वाऱ्या व उत्सव यांमध्ये शिस्त व सुव्यवस्था ठेवण्याच्या प्रयोजनार्थ करावयाच्या कोणत्याही कार्यवाहीच्याबाबतीत समितीस सर्वसाधारण निदेश देता येईल.

(२) राज्य शासनास किंवा राज्य शासनाने, प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांचे योग्य प्रकारे परिरक्षण व प्रशासन करण्यात येत आहे, तसेच मंदिराचा निधी ज्या प्रयोजनार्थ प्रस्थापित करण्यात आला आहे फक्त याच प्रयोजनासाठी त्याचा विनियोग करण्यात येत आहे याबद्दल आपली खात्री करून घेण्यासाठी, राज्य शासनाच्या किंवा त्या अधिकाऱ्याच्या मते अगदी आवश्यक असेल अशी सर्व माहिती, लेखे किंवा अहवाल मागविता येतील व अशी मागणी केल्यावर समिती राज्य शासनास, किंवा यथास्थिती, अशा अधिकाऱ्यास अशी माहिती, लेख किंवा अहवाल ताबडतोब पुरवील.

**४६.** राज्य शासनास, दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या संबंधातील कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता, अभिलेख, दस्तऐवज, आराखडे, लेखे व इतर दस्तऐवज यांची पाहणी करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची प्रतिनियुक्ती करता येईल आणि समिती आणि तिचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अशा पाहणीसाठी अशा व्यक्तीस सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याचे बंधन राहील.

शासनाने पाहणी करणे.

**४७.** धर्मादाय आयुक्तांचा अहवाल मिळाल्यावर कार्यकारी अधिकारी व समिती यांचे कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधातील अभिलेख हे, अशा कार्यवाहीचा कायदेशीरपणा किंवा त्याखाली दिलेल्या निर्णयाचा अथवा आदेशाचा बिनचूकपणा, कायदेशीरपणा किंवा औचित्य याबाबत स्वतःची खात्री करून घेण्याच्या दृष्टीने मागवून घेणे व त्यांची तपासणी करणे आवश्यक व इष्ट आहे असे राज्य शासनास वाटल्यास त्यास तसे करता येईल व कोणत्याही बाबतीत असा कोणताही निर्णय किंवा आदेश यात फेरबदल, विलोपन किंवा प्रत्यावर्तन केले पाहिजे किंवा तो फेरविचारार्थ पाठविला पाहिजे असे राज्य शासनास आढळून आले तर, राज्य शासनास, त्याप्रमाणे आदेश काढता येतील.

अभिलेख, इत्यादी मागविण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

राज्य शासनास, अशा कोणत्याही निर्णयाची किंवा आदेशाची अंमलबजावणी त्यासंबंधात या कलमाखाली असलेल्या आपल्या अधिकारांचा वापर करण्यात येईपर्यंत स्थगित करता येईल :

परंतु, संबंधित पक्षकारांना स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्यावाचून राज्य शासन या कलमान्वये कोणताही आदेश देणार नाही.

**४८.** दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था किंवा त्यांची कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता यांच्या संबंधातील कोणतेही अभिलेख, नोंदवही, अहवाल, किंवा इतर दस्तऐवज ज्यांच्या अभिरक्षेत आहेत असे सर्व शासकीय अधिकारी, कार्यकारी अधिकारी फर्मावील त्याप्रमाणे उक्त अभिलेख, नोंदवही, अहवाल किंवा इतर दस्तऐवज किंवा त्यामधील उतारे पुरवितील.

सरकारी अधिकाऱ्यांनी विवक्षितदस्तऐवजांच्या प्रती किंवा त्यातील उतारे पुरविणे.

**४९.** (१) समिती दरवर्षी दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या प्रशासनासंबंधीचा अहवाल, प्रत्येक वर्ष संपल्यापासून सहा महिन्याच्या आत, तयार करील व तो अहवाल धर्मादाय आयुक्तामार्फत राज्य शासनास सादर करील.

प्रशासन अहवाल.

(२) दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था यांच्या रकमा व लेखापरीक्षकांचा अहवाल आणि त्यावर धर्मादाय आयुक्ताने दिलेले निदेश यांसह. अशा अहवालाचा मथितार्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल, व त्यानंतर, शक्य तितक्या लवकर तो, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

१९६० चा ४५ **५०.** समितीचे अधिकारी, कर्मचारी व तिचे सदस्य हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे.

**५१.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, राज्य शासन किंवा समिती किंवा तिचा कोणताही सदस्य किंवा समितीचा कार्यकारी अधिकारी किंवा इतर कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांपैकी कोणीही, या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार सद्भावनेने कोणतीही गोष्ट केली असेल किंवा केल्याचे दिसून येत असेल तर त्याच्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा दाखल करता येणार नाही किंवा कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

दाव्यास किंवा कार्यवाहीस रोध.

**५२.** त्या त्यावेळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा नेमलेल्या दिवसापूर्वी तयार केलेल्या मंदिरांच्या व्यवस्थापनाबाबतची कोणतीही योजना किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही हुकूमनामा किंवा न्यायालयाचा आदेश किंवा दाननिधी किंवा नोंदणीकृत विश्वस्त व्यवस्था यांच्या संबंधात प्रचलित असलेली कोणतीही प्रथा, रूढी किंवा परिपाट यामध्ये याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, हा अधिनियम अंमलात राहील.

अधिनियमाचा अधिभावी अंमल.

समितीचे विसर्जन व अधिक्रमण.

**५३.** (१) या अधिनियमान्वये समितीवर सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्यास समिती सक्षम नाही किंवा त्यांची कर्तव्ये पार पाडण्यात कसूर करीत आहे, किंवा तिला असलेल्या अधिकारांपेक्षा ती जादा अधिकार वापरत आहे किंवा गैरवापर करीत आहे असे जर धर्मादाय आयुक्ताचा अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासनाचे मत झाले तर राज्य शासनास, योग्य ती चौकशी केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त समितीचे विसर्जन करून विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत दुसऱ्या समितीची पुन्हा स्थापना करता येईल किंवा सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी उक्त समितीचे अधिक्रमण करता येईल.

(२) पोट-कलम (१) खाली अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, राज्य शासन ज्या कारणास्तव त्याने तसे करण्याचे योजिले आहे ती कारणे समितीस कळवील व या प्रस्तावाविरुद्ध कारण दाखविण्यासाठी समितीस वाजवी वेळ देईल. तसेच कोणतेही स्पष्टीकरण किंवा आक्षेप असल्यास, त्यावर विचार करील.

(३) या कलमान्वये समिती विसर्जित करण्यात आली असेल किंवा तिचे अधिक्रमण करण्यात आले असेल त्याबाबतीत, राज्य शासन यथास्थिती, दुसऱ्या समितीची पुनर्रचना होईपर्यंत किंवा अधिक्रमणाचा कालावधी संपेपर्यंत, समितीच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाच्या क्रियाशील सेवेत असलेल्या किंवा अशा सेवेमधून निवृत्त झालेल्या व हिंदू धर्माच्या अनुयायी असलेल्या आणि विठ्ठलाच्या व रुक्मिणीच्या भक्त असलेल्या आणि या प्रयोजनास्तव राज्य शासनाकडून निश्चित केलेल्या नमुन्यात तदनुसार प्रतिज्ञापन करतील अशा व्यक्तींमधून एका व्यक्तीची (जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या) नेमणूक करील :

परंतु, ज्या कालावधीत समिती अधिक्रमणात राहील, त्या कालावधीमुळे, सदस्यांचा पदावधी कलम २४ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पाच वर्षांहून अधिक वाढविता येणार नाही.

(४) राज्य शासनास, अशा अधिकाऱ्याचे पारिश्रमिक व सेवेच्या इतर शर्ती निश्चित करता येतील व असे पारिश्रमिक मंदिर निधीमधून देण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

**५४.** (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे व पूर्व प्रकाशनाच्या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या कलमान्वये करण्यात आलेला नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून, यथास्थिती, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा ते अंमलात येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपने यामुळे त्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

उपविधि करण्याचा समितीचा अधिकार

**५५.** समितीस कोणताही कायदा, आदेश, रूढी, परिपाट किंवा कोणत्याही न्यायालयाने काढलेला कोणताही हुकूमनामा, दिलेला आदेश किंवा योजना यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आयुक्तांच्या पूर्व मान्यतेने, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी या अधिनियमाशी किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमांशी विसंगत नसतील असे उप-विधी करता येतील.

(क) मंदिरात नित्य म्हणजेच दैनंदिन किंवा नैमित्तिक म्हणजेच प्रासंगिक पूजा किंवा उपचार करणाऱ्या व्यक्तीच्या अर्हता, त्यांचा सेवाप्रवेश व सेवेच्या अटी विहित करणे;

(ख) सर्वसाधारणतः किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट प्रसंगी देवतांचे दर्शन घेण्याची रीत व त्याची वेळ;

(ग) मंदिरात पार पाडण्यात यावयाच्या निरनिराळ्या प्रकारच्या पूजा, ज्यांना स्वतः अथवा समितीकडून नेमण्यात आलेल्या पुजाऱ्यांकडून पूजा करता येईल अशा व्यक्ती व त्याबाबतीत परवाने देणे. निरनिराळ्या प्रकारच्या पूजा करण्यासाठी द्यावयाचा खर्च;

(घ) मंदिरात, भक्त किंवा यात्रेकरू यांच्याकडून दक्षिणा मागणे व मंदिरात भीक मागणे यावर मनाई;

(ङ) मंदिरामधील निवासावर निर्बंध;

(च) ज्या व्यक्ती दक्षिणेची याचना करून भक्त किंवा यात्रेकरू यांना त्रास देतील व देवतांचे शांततेने दर्शन घेण्यास त्यांना अडथळा करतील अशा व्यक्तींना मंदिरामधून बाहेर काढणे व त्या प्रयोजनार्थ, आवश्यक असेल तर, पोलिसांच्या सहाय्याने बलाचा आवश्यक तो वापर करणे;

(छ) ज्यामुळे भक्त व यात्रेकरू यांना मंदिरातील देवतांचे दर्शन शांततेने घेता येणे शक्य होईल अशा कोणत्याही बाबी, त्यासाठी सर्वसाधारणतः व विशिष्ट प्रसंगी करावयाची योग्य ती व्यवस्था, मंदिरामध्ये सुव्यवस्था राखणे व दाननिधी व नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्थांच्या उचित प्रशासनासंबंधीच्या सर्व इतर बाबी व मंदिर निधीतील पैशांचा व्यवहार करण्यासाठी तरतुदी करणे आणि समितीच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन, तसेच या अधिनियमाची प्रयोजने व उद्दिष्टे पार पाडणे.

(२) जी व्यक्ती एखाद्या उपविधीचे किंवा कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील अशा कोणत्याही व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल, अशी तरतूद उक्त तरतुदींमध्ये करता येईल.

**५६.** या अधिनियमाद्वारे अथवा तदन्वये स्पष्टपणे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या तरतुदी या, मंदिर दाननिधी आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था यांच्या मालमत्ता, मंदिर निधी आणि त्यांना पूरक असलेल्या अथवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व बाबी यांचे व्यवस्थापन आणि प्रशासन यांच्या संबंधात लागू होतील. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम लागू असणे

**५७.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यामध्ये कोणतीही अडचण उद्भवल्यास राज्य शासनास आदेशाद्वारे, प्रसंगी आवश्यक असेल त्याप्रमाणे, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करणे

## अनुसूची "क"

[कलम २ (छ) पहा]

### विठ्ठल मंदिरातील दैनंदिन म्हणजेच नित्य सेवांचे वर्णन

ज्यांना प्रातःकाळच्या सेवा अर्पित करावयाच्या असतात अशा सर्व व्यक्तींना, स्नान करून जे सोवळे म्हणून समजण्यात येते असे रेशमी वस्त्र नेसून, विठ्ठल मंदिरात उपस्थित राहावे लागते.

पहाटे सुमारे ४ वाजता शेजघर असलेले चौखांबी सभागृह चावीने उघडण्यात येते. दरवाजा उघडणारी व्यक्ती दोन्ही हात जोडून उभी राहाते व जागे होण्याबद्दल देवाला आळवते. शेजघरात प्रवेश केल्यानंतर ती, आदल्या

रात्री अर्पण केलेल्या नैवेद्याचा राहिलेला भाग काढून घेते, त्या खोलीचे दरवाजे बंद करते व गाभाऱ्यात प्रवेश करून विठ्ठल मूर्तीला लोणी आणि खडीसाखर अर्पण करते.

### काकड-आरती

२. त्यानंतर काकड-आरतीचा विधी सुरू होतो. तुपात किंवा शुद्ध लोण्यात भिजवलेल्या काकड-वातीने (ज्याला "काकडा" असे संबोधण्यात येते) विठ्ठल मूर्तीला ओवाळण्यात येते व उपस्थित असलेल्या सर्व व्यक्ती देवाची स्तुतिपर स्तोत्रे म्हणतात. हे संपल्यानंतर, मूर्तीला लोणी व खडीसाखरेचा नैवेद्य अर्पण करण्यात येतो, स्तोत्र न म्हणता, किंवा प्रज्वलित केलेल्या काकडवातीने पुन्हा ओवाळण्यात येते, नंतर काकडा बाहेर आणण्यात येतो व उपस्थित असलेल्या सर्व व्यक्तीमध्ये फिरविण्यात येतो, त्या पेटवलेल्या काकडवातीद्वारे कृपाप्रसादाचा लाभ घेतल्याचे निदर्शक म्हणून ते आपले हात त्याच्यावरून फिरवतात.

### पाद्य-पूजा

३. काकड-आरती झाल्यानंतर, पाद्यपूजेच्या विधीला सुरुवात होते. उदबत्त्या लावून त्या उदबत्त्यांनी ओवाळल्यानंतर (धूपारती केल्यानंतर) विठ्ठल मूर्तीला लघु नैवेद्य अर्पण करण्यात येतो. त्यानंतर फुलांचे हार काढण्यात येऊन मूर्तीवरील वस्त्रे उतरविण्यात येतात. त्यानंतर महापूजेला सुरुवात होते. ही षोडषोपचार पूजा आहे.

### महा-पूजा

४. पुरुषसूक्त या वैदिक सूक्ताचे पठण चालू असताना देवाला दूध. दही, मध, तूप व साखर या पंचामृतांनी स्नान घालण्यात येते, व त्यानंतर साध्या व त्यानंतर सुवासिक पाण्याने स्नान घालण्यात येते. मूर्तीवरील तेलाची पुटे घालवण्यासाठी आठवड्यातून बुधवार व रविवार या दोन दिवशी विठ्ठल मूर्तीला तेल लावून साखरेने व पाण्याने चोळण्यात येते. स्नान घातल्यानंतर पुजारी वस्त्राने मूर्ती स्वच्छ पुसतो व मूर्तीला सकाळचा पोषाख चढवतो. अत्तर लावण्यात येते व मूर्तीच्या पुढे आरसा दाखविण्यात येतो. त्यानंतर नैवेद्य म्हणजेच खाद्यपदार्थ अर्पण करण्यात येतात व त्यानंतर प्रज्वलित केलेल्या "एकारती" ने म्हणजेच प्रज्वलित केलेल्या वातीने मूर्तीला ओवाळण्यात आल्यानंतर प्रज्वलित केलेली "एकारती" म्हणजेच प्रज्वलित केलेली वात बाहेर नेण्यात येऊन परिवार देवता म्हणून संबोधण्यात येणाऱ्या इतर बऱ्याच देवतांना तिने ओवाळण्यात येते. एकारती चालू असताना, स्तोत्रे म्हटली जातात हा विधी सूर्योदय झाल्यानंतर थोड्या वेळात संपतो व "आरती" झाल्यानंतर सकाळी ७ वाजेपासून 'दुपारी ११ वाजेपर्यंत लोकांना विठ्ठल मूर्तीचे दर्शन घेता येते.

### महा-नैवेद्य

५. दुपारी, देवाच्या खास पाकशाळेत तयार केलेला महानैवेद्य किंवा वरण-भात, पुऱ्या, भाज्या व पंचपक्वान्न यांनी युक्त असलेले भोजन देवाला अर्पण करण्यात येते. यावेळी महानैवेद्य अर्पण करणे याशिवाय दुसरा विधी नसतो. परंतु या महानैवेद्याच्यावेळी बरेचसे लोक त्यांच्या घरी बनविलेले पदार्थ आणतात व ते विठ्ठल मूर्तीपुढे थोडा वेळ ठेवून ते घरी घेऊन जातात.

### दुपारी पोषाख बदलणे

६. दुपारी ३ किंवा ४ वाजता मूर्तीचा पोषाख बदलण्यात येतो. केवळ विशेषप्रसंगीच मूर्तीवर अलंकार घालण्यात येतात, अन्यथा फक्त नेहमीचे मोजकेच अलंकार मूर्तीवर घालण्यात येतात. देवाला पोषाख चढविण्यात येतो त्यावरून तो दुपारी भक्तांच्या भेटीस सज्ज झाला हे सूचित होते. मूर्तीला पोषाख चढविल्यानंतर दुपारचा उपहार म्हणून लाडवांचा नैवेद्य मूर्तीला दाखविण्यात येतो.

## धूपारती

७. दुपारचे ४ व सायंकाळ यामधील वेळेत भक्तांना विठ्ठल मूर्तीचे दर्शन घेता येते. सायंकाळी सूर्यास्ताच्या सुमारास धूपारती होते. धूप लावलेले धूपपात्र आणण्यात येते व घंटा आणि टाळ यांच्या नादामध्ये आरत्या म्हणण्यात येतात. मूर्तीची पावले धुतल्यानंतर मूर्तीला फुले अर्पण करण्यात येतात. धूपारतीच्यावेळीसुद्धा, लघु नैवेद्य अर्पण करण्यात येतो.

## शेजारती

८. रात्री १० व ११ याच्या दरम्यान शेजारती होते व यावेळी बराच मोठा समुदाय उपस्थित असतो. मूर्तीचे आसन व शेजघर यांच्यामधील जमिनीवर पाणी शिंपडण्यात येते व ती झाडून घेण्यात आल्यावर तिच्यावर पाऊलघड्या घालण्यात येतात. शेजघराचे दार उघडण्यात येऊन शेज तयार करण्यात येते. दिवा लावण्यात येतो, गरम दुधाचे पात्र व पिकदाणी देवाच्या पावलाजवळ ठेवण्यात येते. देवाची पावले धुण्यात येतात, स्तोत्रे म्हणण्यात येतात व एकारतीने किंवा प्रज्वलित केलेल्या काकड्याने ओवाळल्यानंतर, मूर्तीवरील पोषाख उतरवण्यात येतो. फुले, इत्यादी अर्पण करण्यात आल्यानंतर देवाने अंतर्गृहात प्रवेश केला असे समजण्यात येते, व सर्वजण तेथून परततात.

## एकादशीचे उपचार विधी

९. वर नमूद केलेली नित्यपूजा व उपचार यांचा परिपाठ एकादशीस वेगळ्या स्वरूपात असतो. एकादशी, चांद्रमासाच्या शुक्ल पक्षातील ११ व्या दिवशी व कृष्ण पक्षाच्या ११ व्या दिवशी, अशी महिन्यातून दोनदा येते. या दिवशी अर्पण करण्यात येणारा नैवेद्य हा, एकादशीच्या उपवासासाठी चालणाऱ्या पदार्थांचा असतो, व एकादशीच्या रात्री देव निद्रिस्त होत नाही असे समजण्यात येत असल्याने, शेजारती व देवाला जागृत करण्याची आवश्यकता नसल्याने परिणामतः दुसऱ्या दिवशी सकाळी काकड आरती होत नाही.

**टीप** :—(१) वर्षात २४ एकादशा असतात, त्यापैकी चार महत्त्वाच्या असून त्यावेळी नेमाने येणाऱ्या यात्रेकरूंच्या वाऱ्या किंवा दिंड्या पंढरपूरला येतात. त्या एकादशा, म्हणजे आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी एकादशी या होत. पहिल्या दोन एकादशांसाठी मोठ्या प्रमाणावर म्हणजेच लाखो यात्रेकरू येतात. अधिक मास म्हणून संबोधण्यात येणारा जादा महिना ज्यामध्ये येतो असे सर्वसाधारणपणे वर तीन वर्षांनी येणारे अधिदिन वर्ष असेल तर, अधिक मास हा पवित्र महिना समजण्यात येत असल्याने त्या महिन्याच्या एकादशीसही मोठ्या प्रमाणावर यात्रेकरू येतात.

(२) एकादशीव्यतिरिक्त आणखी उत्सवही साजरे करण्यात येतात. ते म्हणजे, रामनवमी, नृसिंह जयंती, गोकुळ अष्टमी किंवा जन्माष्टमी व महाशिवरात्री हे होत. विठ्ठल हे विष्णूचे रूप समजण्यात येत असले तरी, भागवत संप्रदायाच्या या वैष्णव मंदिरात, शिवाचे महात्म्य असलेला महाशिवरात्रीचा दिवससुद्धा महत्त्वाचा समजण्यात येऊन तोसुद्धा पाळण्यात येतो. ही, भक्तिमार्गाचा प्रसार करणाऱ्या विठ्ठल मंदिराच्याबाबतीत उल्लेखनीय बाब आहे. वाऱ्या किंवा यात्रा संपल्यानंतर, प्रक्षाल पूजा करण्यात येते.

## रुक्मिणी व इतर देवतांचे मंदिर

भक्तांना रुक्मिणी व विठ्ठल या दोन्ही मंदिरातील विधीना उपस्थित राहून ते पाहता येण्याची संधी मिळावी म्हणून, विठ्ठल मंदिरातील नित्य विधी पार पाडण्यात आल्यानंतर लगेच तेच विधी विठ्ठल पत्नी रुक्मिणीच्या मंदिरात पार पाडण्यात येतात. दोन्ही मंदिरातील विशेष प्रसंगीच्या नित्य उपचारांमध्ये कोणताही फारसा फरक

नसला तरी, देवीसाठीच उचित ठरतील असे नित्य उपचार विधी हे रुक्मिणी मंदिरात करण्यात येतात. तसेच, रुक्मिणीच्या सत्यभामा व राही किंवा राधिका यासारख्या परिवार देवतासुद्धा आहेत; तसेच विठ्ठलाच्याही परिवार देवता असून त्यांची नित्य पूजा करण्यात येते.

## अनुसूची "ख"

[ कलम २ (न) पहा ]

विठ्ठल व रुक्मिणी यांच्या मंदिरात भक्तांकडून अथवा त्यांच्या वतीने पार पाडण्यात येणाऱ्या विशेष सेवा अथवा पूजा पुढीलप्रमाणे आहेत :—

१. महापूजा
२. पाद्यपूजा
३. तुळशी अर्चन पूजा
४. कापूर आरती
५. अलंकार पूजा
६. सवस्त्र पूजा
७. अवस्त्र पूजा
८. केशर अर्चन

नवरात्रीसारख्या विशेष प्रसंगी, विठ्ठल मंदिरातील तुळशी अर्चन पूजेऐवजी रुक्मिणीच्या मंदिरात कुंकुम अर्चन पूजेसारख्या पूजा पार पाडण्यात येतात आणि त्यावेळी ओटी म्हणून खण, नारळ, इत्यादी वस्तू देण्यात येतात. उक्त देवतेच्या संबंधात होणारे असे धार्मिक विधी उचित असेच आहेत.

## अनुसूची "ग"

### नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था

[ कलम २ (यक) पहा ]

१. विठ्ठल मंदिर, पंढरपूर, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-३७९ (सोलापूर).

२. श्री रुक्मिणी मंदिर, पंढरपूर (देवीच्या सर्व परिवार देवतासमवेत), सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-३६५ (सोलापूर).

३. विठ्ठलाच्या परिवार देवता, पंढरपूर (सर्व परिवार देवता स्वतंत्र विश्वस्तव्यवस्थेखाली नोंदलेल्या आहेत) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-३७८ (सोलापूर).

४. न्यायालयाच्या आदेशानुसार देवस्थान समितीशी एकत्रित करण्यात आलेले सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-१६१, ए-१६२ व ए-१६३ (सोलापूर), यांसह श्री. विठ्ठल रुक्मिणी देवस्थान समिती, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-३२४ (सोलापूर).

५. श्री गरुड देवस्थान, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-३३४ (सोलापूर).

समस्त कोळी समाजाची महादेव देवस्थाने व पुंडलिक देवस्थान, पंढरपूर, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी क्रमांक ए-३८२ (सोलापूर)—ही विश्वस्तव्यवस्था या अधिनियमाच्या कलम २, खंड (थ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या चार शिवलिंगाशी संबंधित असेल तेथवर.

## अनुसूची "घ"

[ कलम ६ (१) पहा ]

| व्यक्ती (१) | | | रक्कम (२) |
|---|---|---|---|
| | | | रुपये |
| १. | बडवे | | २,३४,८८८.०० |
| २. | सेवाधारी— | | |
| | (क) | पुजारी | ३३,६३८.०० |
| | (ख) | बेणारी | १०,९२५.०० |
| | (ग) | परिचारिक | ६,०३८.०० |
| | (घ) | हरदास | ६,०३८.०० |
| | (ङ) | डिंगरे | २,५८८.०० |
| | (च) | डांगे | २,०१३.०० |
| | (छ) | दिवटे | २,०१३.०० |
| ३. | उत्पात | | ६९,०००.०० |
| ४. | कोळी | | १,४३८.०० |
| | | एकूण | ३,६८,५७९.०० |

(यथार्थ अनुवाद)
**प. ग. पाटील,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

एच २८-२,०६१-३.२००२

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.